
# नवनीत

प्रगत शिक्षण संस्था, फलटण.

वार्षिक पत्रिका १९९९



# मुखपृष्ठाविषयी

वरवर पहाता काहीसं तुटक-तुटक, अपूर्ण आणि अर्थ न लावता येण्यासारखं हे चित्र वाटत असलं तरी थोडं लक्षपूर्वक पाहिल्याने त्यातील डोंगर रांगांची, त्यामधील वसलेल्या जंगलांची, त्या जंगलात नांदत असणाऱ्या वन्यजीवांची, जंगलातील झाडांच्या भव्यतेची आणि त्यांच्या रानवटतेची सूक्ष्म जाणीव मनाला स्पर्शून जाते.

आपण पुढे हे पाहतो की चित्रात एक मातीचं भांडं आहे. एक मुलीचा पोषाख आहे. ह्या गोष्टी आपल्याला त्या जंगलातील आदिवासींच्या राहणीची आणि अस्तित्वाची कल्पना करवून देतात.

हे चित्र आहे मेळघाटचं. अमरावती जिल्ह्यातील सातपुडा पर्वताच्या रांगा आणि त्यावरचं जंगल हे मेळघाट म्हणून ओळखलं जातं. मेळघाट हे असं ठिकाण आहे की ज्याला भेट देऊन आल्यानंतर त्याचा मनावर उमटलेला ठसा हा प्रत्येकजण आपापल्या परीने कागदावर उतरवून ती संवेदना पक्की करतो. कविता,लेख, नोंदी यापेक्षा मेळघाटचे मनावर उमटलेले भाव हे चित्र रुपाने चित्रकर्ती इथे दाखवू इच्छिते.

हर तऱ्हेची झाडे आपणाला इथे दिसतात. ह्या झाडांच्या निवाऱ्याला असणारे व त्यांच्यावर प्रत्यक्षअप्रत्यक्ष रीतीने जगणारे प्राणी दिसतात. जंगलात विपुल प्रमाणात आढळणाऱ्या सतत सावध असलेल्या सांबर हरणाचा नर चित्रात सावध दृष्टीने आपल्याकडेच पहाताना दिसतो. आपण मात्र त्याच्या मनमोहक, फाटे फुटलेल्या शिंगांच्या गुंत्यात अडकून पडतो.

जमिनीवरचा पालापाचोळा, कडे कपारी, बेचक्या, बिळं यांचा आसरा घेत रहाणारा नागही जेव्हा शिकारीसाठी बाहेर निघतो तेव्हा लयदार नागमोडी चालीने चालू लागतो. थोडं थांबून भक्ष्याचा वेध घेतो. असाच थोडा थांबून व अलगद फणा उचलूण भक्ष्याचा वेध घेणारा नाग इथे आहे. नाग आणि त्यांच्या सर्प भाईबंदांना भक्ष्याच्या शोधात निघताना स्वतः दुसऱ्या कोणाचे तरी भक्ष्य होऊ नये याची खबरदारी घ्यावी लागते. कारण याच जंगलात आढळतात ते सापमाऱ्या गरूड. हे पक्षी फारच चपळ असतात. त्यांची दृष्टी फार तीक्ष्ण असते. एखादा दृष्टीमध्ये पकडलेला साप क्वचितच त्यांच्या पंज्यामधून निसटून जातो. पंख पसरलेला सापमाऱ्या गरुड या चित्रात आपल्याला दिसतो. या सर्व प्राण्यांच्या रुबाबापेक्षा वेगळाच डौल असतो तो वाघाचा आणि मेळघाटचा वाघ दिसणं म्हणजे उंबराला फूल येणं. त्याच्या अस्तित्वाच्या खुणा मात्र भरपूर सापडतात. म्हणूनच त्याचं अस्तित्व दाखवणारा पाठीचा भाग चित्रकर्ती इथं काढते कारण काही सुदैवी व्यक्तीच केवळ वाघाची पाठ अथवा शेपूट पाहतात. सबंध वाघ दिसणं ही एक मेळघाटी दुर्मिळ गोष्ट.

हे चित्र पहताना आपल्याला असं जाणवतं की हे पुरेसं रेखीव नाही. चित्रातील पात्रेही पूर्णतः काढलेली नाहीत. प्रमाणबध्दता व चित्राच्या खोलीचा अथवा तिसऱ्या मितीचा विचार केलेला नाही आणि यासारखे अनेक पारंपारिक चित्र निर्मितीचे मूलभूत नियम मानले गेलेले नाहीत. पण या चित्राकडे पहताना एक उत्कृष्ट निसर्गचित्र म्हणून न पाहता एक मनावर पडलेल्या छापेचं प्रतिबिंब म्हणून पहायचं आहे. जो मेळघाट चित्रकर्ती अनुभवते तो आपण तिच्या निर्मितीतून अनुभवायचा आहे.

ह्या चित्रकृतीतून आपल्याला जंगलाच्या भव्यतेची व अफाटतेची कल्पना येते. वन्यजीवांच्या रूपाने जंगल सजीव होऊन उठतं. आपणाला वाटत रहातं की यात आणखी काय असेल? चित्रकर्तीलाही हेच वाटत असावं म्हणूनच आपण चित्रात एका पाठमोऱ्या युवतीचे डोके आणि वेणी असे पाहतो. जी स्वतः चित्रकर्ती आहे आणि मेळघाटची अफाटता अनुभवते आहे. खोल दडी मारून बसलेल्या गुपितांचा शोध घेते आहे.

**वसिम मणेर**

प्रगत शिक्षण संस्था, फलटण

वार्षिक पत्रिका

# नवनीत

डिसेंबर १९९९

**संपादकीय मंडळ**
मधुरा राजवंशी
प्रशांत वायसे
वसिम मणेर

**संपादकीय सहाय्य**
डॉ. मंजिरी निमकर
डॉ. मॅक्सीन बर्नसन

**रेखाचित्रे**
असिफ मेटकरी, इ. ७ वी
गणेश लोंढे, इ. ९ वी
इकबाल शेख, इ. ८ वी
आणि इतर

**मुखपृष्ठ**
समीरा कुरेशी

**प्रकाशन** : प्रगत शिक्षण संस्था, टपाल पेटी ५५ फलटण ४१५ ५२३.
फोन : ०२१६६ - २३०४१
**संगणकीय अक्षरजुळणी** : सीमा निंबाळकर, वसिम मणेर, प्रकाश अनभुले
**मुद्रण** : रूप स्क्रीन आर्टस् फलटण

# अजिता काळे - संवेदनशील, कलासक्त मैत्रीण



अजिता काळे
१९४२-१९९६

"नवनीत" चा यंदाचा अंक निघत आहे दोन प्रिय व्यक्तींच्या मृत्यूच्या छायेत. ते दोघेजण म्हणजे अजिता काळे व रविसर. दोघे होते संवेदनशील, साहित्यप्रेमी. अजिताचे निधन झाले २४ जुलै, १९९६ ला, रविसरांचे १२ ऑक्टोबर, १९९८ ला. रविसर कमला निंबकर बालभवनमधले शिक्षक होते म्हणून ते शाळेच्या दैनंदिन जीवनाचा भाग होते. त्यांच्या निधनाने सर्व शाळा शोकाकूल झाली हे प्रशांत वायसेने लिहिलेल्या ह्या अंकातील लेखात दिसून येते.

अजिता ही माझी मैत्रीण -- मूळ भारतीय पण अमेरिकेत जाऊन स्थाईक झालेली. ती फक्त एकदाच कमला निंबकर शाळेत येऊन गेली होती. मात्र अप्रत्यक्ष का होईना तिचा शाळेशी व प्रगत शिक्षण संस्थेशी महत्वाचा संबंध व भक्कम पाठिंबा होता. शाळेचे वातावरण आवडले म्हणून तिने मुद्दाम आपला मुलगा अलोक ह्याला १९९१ साली दोन आठवडे इथे राहायला पाठवले होते. तिने स्वतः देणग्या तर दिल्याच शिवाय अमेरिकेतील महाराष्ट्र फौंडेशनमार्फत आर्थिक सहाय्य मिळवायला मदत केली.

अजिताच्या निधनानंतर तिच्या स्मरणार्थ तिचे पती डॉ. अशोक काळे यांनी निधी पाठवला असून, त्यावरील व्याजापासून दर वर्षी "नवनीत" चा अंक काढता येईल. ह्याशिवाय लायब्ररीसाठी मराठी पुस्तके घेता येतील.

अजिताची ओळख अगदी थोडक्यात कशी देता येईल? तिच्या एका मैत्रीणीच्या शब्दांत सांगायचे तर ती "एक उत्साहाचं कारंजं होती." आमची ओळख झाली शिकॉगोच्या महाराष्ट्र मंडळामध्ये -- बहुतेक १९८९ मध्ये. तिच्याबरोबर मी गेल्झबर्गला यावं असं तिनं सुचवले आणि मी होकार दिला.

ह्या चार-पाच तासांच्या प्रवासामध्ये व घरी गेल्यावर रात्री उशिरपर्यंत आमच्या गप्पा अखंडच चालल्या. मराठीमध्ये बोलणे, मराठी वाङमय, महाराष्ट्रातील जीवन, राजकारण व इतर अनेक विषयांबद्दल बोलणे ही जणू काय तिची भूकच होती.

वास्तविक अजिता व अशोक काळे दोघे अमेरिकेतल्या जीवनामध्ये पूर्णपणे समरस झाले होते. अशोक स्वतःची मेडिकल प्रॅक्टिस करतात. अजिताने एक फॅमिली प्लॅनिंग क्लिनिक सुरू करून यशस्वी रीतीने चालवित होते. अनेक तरुण अमेरिकन येऊन तिच्याकडून परकीय न वाटता सल्ला घेत. आपला व्यवसाय संभाळत दोघे नवरा-बायको मराठी वाङमययाशी संबंध ठेवत. दोघे गोष्टी व लेख लिहीत असत. अजिताचे शेवटचे पुस्तक "देशान्तराच्या गोष्टी" मागच्या वर्षी प्रसिध्द झाले. त्यात तिच्या लहानपणाच्या आठवणी फारच वाचण्यासारख्या आहेत. ती मुंबईत राहणारी होती. आईवडील दोघे डॉक्टर होते. कुटुंब श्रीमंत, पण बुध्दीवादी व साधे राहणारे. अजिता हुशार, धाडशी, अभ्यासाशिवाय गायन, चित्रकला, नाटक, पोहणे ह्या सगळ्यामध्ये प्राविण्य मिळविणारी मैत्रिणीवर खूप प्रेम करणारी.

नंतर तिने मराठीमध्ये बी. ए. व एम. ए. केले. दोन्ही वेळेस फर्स्ट क्लास मिळवून प्रतिष्ठित पारितोषके मिळविले. लग्न झाल्यानंतर मुंबई येथील Tata Institute of Social Sciences मध्ये तिने दुसरी एम. ए. केली. वाङमय सोडून ती सामाजिक कार्यामध्ये का गेली, हे तिने एकदा स्पष्ट केले: "मला गायन, चित्रकला, भरतकाम, वाङमय या सगळ्यात रस आणि गती आहे. पण यापैकी काहीच ध्येय होऊ शकत नाही. आवडीच्या क्षेत्रात म्हणजे सोशल वर्कच्या क्षेत्रात अभ्यास, काम करत असल्याशिवाय मला चैन पडत नाही. या सगळ्या कला मला फावलया वेळात आनंद देतात, पण मुख्य काम नसेल तर या कलांनाही रस राहत नाही."

अमेरिकेत गेल्यानंतर ती अमेरिकेतल्या मध्यवर्ती भागी असलेल्या गेल्झबर्ग, ह्या छोट्या गावामध्ये राहायला गेली. तिथे तिने १९८० मध्ये फॅमिली प्लॅनिंगचे क्लिनिक सुरू केले व तब्बल पंधरा वर्षे चालू ठेवले. परंतु त्याचवेळी शेवटी अमेरिकेतील गर्भपात-विरोधी आंदोलनामुळे सरकारी पैसे पूर्वीसारखे मिळेनासे झाले.

इकडे भारतात अजिताच्या आईची प्रकृती ढासळलेली होती. आईच्या मदतीला आपण जाऊ शकत नाही, ह्याची तिला खंत होती. एका कवितेमध्ये तिने लिहिले:

माहेरच्या वाटसरा, जरा थबकुन वळा
सांगा निरोप आईला, फुले प्रीतीचा मळा ॥

अर्ध्या जगाचं अंतर ओलांडून लेक जाई
नाव उजळील तुझं, खंत नको मानू बाई ॥

मन उदास उदास, काळ कंटू तरी कसा
राहण्याचा परदेशी, मीच घेतलासे वसा ॥

शेवटी अजिताची आई १९९५ च्या उन्हाळ्यात गेली व क्लिनिकवर अर्थिक संकट आल्यामुळे अजिताने डिसेंबरमध्ये राजिनामा दिला. आई गेली आणि तिच्याबरोबर आपले जीवनकार्यही गेले ह्या दुहेरी धक्क्यातून अजिता स्वतःला सावरू शकली नाही व अखेर तिने २४ जुलै, १९९६ रोजी जगाचा निरोप घेतला. मात्र "नवनीत" च्या ह्या अंकातून व पुढील अनेक वर्षांच्या अंकांतून अजिताच्या उत्साही, संवेदनाशील व कलासक्त व्यक्तिमत्त्वाचे सुस्मरण राहील.

मॅक्सीन बर्नसन

# अनुक्रमणिका


समाजाचे व सृष्टीचे ऋण मानणारी मुलं ■ विद्याधर म्हैसकर - १
पोलिस काकांची मुलाखत ■ शब्दांकन : कल्पिता दंडवते (शिक्षिका, इ. ४ थी) - २
कविता : मशीन फिरतं ■ अमित डोंगरे - ५
कविता : सच्चे दोस्त ■ जावेद मणेर
पाऊस ■ निशा जगताप
एक होते मोठे झाड ■ जावेद मणेर - ६
स्वतःचा इतिहास ■ धीरज चव्हाण - ७
जिरवली खाशी ■ मधुरा राजवंशी - ८
पुढच्यास ठेच मागचा शहाणा ■ कौस्तुभ वाघ - ९
जाई निंबकर ह्यांची मुलाखत ■ शब्दांकन : आशाताई रुद्रभटे (माध्यमिक शिक्षिका) - १०
आठवणीतील सानेगुरुजी ■ नेहा नेवसे - १३
दुष्काळ आणि शेतकरी ■ संग्राम राऊत
कविता फुलपाखरू ■ निशा जगताप-१४
कविता : मंत्री ■ गिरीश फणसे
एक जुने घर ■ गणेश लोंढे - १५
शाळा ■ प्रशांत वायसे - १६
समाजसेवेचा कँप ■ माणिक शितोळे - १७
शाळा सुटल्यावर ■ योगेश शिंदे - १८
रंगलेला सामना ■ शैलेश भोसले - १९
सहल ■ माणिक शितोळे - २०
कविता : बाभळी होती एकली ■ नादिया कुरेशी
बळी ■ धीरज चव्हाण - २१
ऊन ■ सबीना मणेर - २२
कावळा अजुनही गातो ■ राजेश निंबाळकर - २३
कविता : दुर्दैवी तो कावळा ■ मनिषा ढेंबरे
गोल चांदोबा गगनात ■ चक्रधर खलाटे
झाडे ■ धीरज चव्हाण - २४
अविस्मरणीय प्रसंग ■ ताहिर मणेर - २५
धामण ■ वसिम मणेर - २६
कविता : आयुष्य, एक अश्रू निसटला ■ अनिरूध्द राजदेरकर - २९
रवी सर ■ प्रशांत वायसे - ३०
कविता : उणीव ■ अनिता लाटे
खेळ सुख दुःखाचा ■ समीरा कुरेशी - ३१

*विद्याधर म्हैसकर हे अचानक लाभलेल्या मित्रासारखे आहेत. पत्नीच्या बदलीमुळे फलटणला आल्यानंतर ते प्रथम शाळेत आले. आणि तरल मनाच्या या निसर्गप्रेमीचं शाळेशी एक नातं जडलं ते कायमचंच. त्यांची चिवट निरीक्षणशक्ती, त्यांच्या पेनमधील कला आणि त्यांची कथाकथनाची हातोटी यामुळेही त्यांच्यातील आणि विद्यार्थ्यांच्यातील संबंध अगदी पक्के झाले. त्या प्रेमापोटीच त्यांनी हे 'नवनीत' वाचून आपले मत देण्याची तयारी दाखविली.*

# समाजाचे व सृष्टीचे ऋण मानणारी मुलं

शाळेतून बाहेर पडणारा आपला विद्यार्थी व्यवहारी जगात यशस्वी झाला तर शिक्षकाला अतिशय आनंद वाटतो. पण त्याहीपेक्षा त्या विद्यार्थ्याने सामाजिक जबाबदारीची जाणीव आणि सभोवतालच्या सृष्टीचे भान सांभाळले तर त्या शिक्षकाची मान अभिमानाने खचितच अधिक उंचावेल.

शिकवलेल्या गणिताचा उपयोग पठाणी व्याज आकारणीसाठी, किंवा भूगोलाचा उपयोग तस्करी करण्यासाठी किंवा इतिहासाचा उपयोग पुरातन वस्तूंची विक्री करण्यासाठी किंवा रसायनशास्त्राचा उपयोग दारू गाळण्यासाठी करून विद्यार्थ्याने जरी वख्खल पैसा मिळवला तरी शिक्षकाच्या दृष्टीने ती दुर्दैवाची गोष्ट ठरेल.

विद्यार्थ्यांच्या हाती 'ज्ञानदीप' तर दिलाय. त्यानं सगळा समाज उजळून टाकायचा की घरदाराला आग लावायची हे ठरवायला त्याला शिक्षकानं पुरेसं नैतिक बळही द्यायला हवं.

आपण ज्यात राहतो तो समाज आणि तो ज्याचा एक भाग आहे ती सृष्टी यांचे ऋण प्रत्येकानं मानायला हवेत. दुसऱ्याला पीडा न देता आनंद द्यायला हवा. दुसऱ्याच्या आनंदात आपण आनंद मानायला हवा. तरच आपण जगायला लायक ठरू हे प्रत्येकानं मनाशी ठरवायला हवं. हे मुलांच्या मनावर बिंबवणं हे शिक्षकांचे फार मोठे आणि अवघड काम आहे. 'नवनीत' ची वार्षिक पत्रिका पाहता ही शाळा आणि त्यातील विद्यार्थी भारताचे नागरिक बनून या शाळेला, शिक्षक वर्गाला भूषणावह ठरतील, अशी मला खात्री आहे.

हिरवा कच्चा आंबा लांब देठावर झुलावा, गवताच्या पात्यावर पिवळे फुलपाखरू दवबिंदूशी हितगूज करीत बसावे, मांजराच्या पिलाने भान हरपून सावल्यांशी खेळावे किंवा कोणी झेपाटाकून लखलखीत वीज एका हाती पकडावी अशा तऱ्हेच्या सूक्ष्म, संवेदनशील आणि थरारक अनुभवातून मुलांनी समाजाशी व सृष्टीशी संवाद साधल्याचं मला स्पष्ट दिसतंच.

काही लिखाणांचा उल्लेख केल्या खेरीज राहवत नाही. धीरजचा 'स्वतःचा इतिहास', सबीनाचं 'ऊन', वसिमची 'धामण', 'बळी' किंवा 'मंत्री'. विषयाला भिडण्याची त्यांची ताकद जबरदस्त आहे. उघड्या डोळ्यांनी शाळेवर, शिक्षकांवर केलेलं प्रेम 'शाळा' आणि 'रवी सर' यातून स्पष्ट दिसतं.

लिखाणाला पूरक काढलेली रेखाटने मुलांचा आत्मविश्वास आणि सूक्ष्मनिरीक्षणशक्ती दाखवितात. सर्वच मुलांचं कौतुक आहे. हे सारं वाचून, बघून मला खूप आनंद होतो. माझ्या सारख्यांची तर सारी भिस्त अशा मुलांवरचं आहे.

**विद्याधर म्हैसकर**

अमृता - मग इथे काही पोलिसांनी युनिफॉर्म का घातलेला नाही?

पाटील काका - कारण ते आमचे हेर आहेत. युनिफॉर्म नसल्याने ते लोकांमध्ये सहजा-सहजी मिसळून माहिती मिळवू शकतात.

सौरभ - गणपती उत्सव, नवरात्र या दिवसांत देवळात किंवा आसपास पोलिस का असतात?

पाटील काका - लोकांनी शिस्त पाळावी, भांडणे - चोऱ्यामाऱ्या होऊ नयेत म्हणून पोलिस देखरेख करत असतात. तसेच मिरवणूक, मोर्चे यावेळीही शांततेचा भंग होऊ नये, लोकांनी शिस्त पाळावी यासाठी पेलिस बंदोबस्त असतो.

विशाल - म्हणून पोलिसांकडे बंदूका असतात का?

विशालच्या या प्रश्नावर काकांनी पोलिसांकडे असलेली हत्यारे दाखविली. पिस्तूल, रिव्हॉल्व्हर, रायफल,त्यांच्या वेगवेगळ्या आकाराच्या गोळ्या, एका वेळी त्यांच्या किती फायरी झाडता येतात, हेही समजावून सांगितले.

पृथ्वीराज - चोरांना तुम्ही कसे पकडता?

पाटील काका - एखादा माणूस अवेळी संशयास्पद फिरताना दिसल्यास किंवा चोरी झालेल्या ठिकाणी चौकशी करून, मिळालेल्या माहितीच्या आधारे आम्ही चोरांना पकडतो. रात्री तुम्ही झोपलेले असता तेव्हा आमचे पोलिस पथक गावामध्ये गस्त घालून पहारा करत असते. अगदी साधा पेन चोरला म्हणून आमच्याकडे तक्रार केलीत तरीही आम्ही चौकशी करतो व चोराला पकडतो.

सुप्रिया - चोर सापडल्यानंतर त्याला तुरूंगात टाकता ना?

पाटील काका - आम्ही चोराला पुराव्यांसकट पकडण्याचे काम करतो. आमच्या येथे एक स्त्री व एक पुरूष असे दोनच लॉकप आहेत. चोराला शिक्षा ठोठावण्याचे काम कोर्ट करते. त्यानंतर त्याची रवानगी तुरूंगात



# पोलिस काकांची मुलाखत

शब्दांकन : कल्पिता दंडवते
(शिक्षिका इ. ४ थी)

आज सकाळी रोजच्यासारखी शाळा भरली. एक-दोन तासही झाले आणि बाई वर्गात येऊन म्हणाल्या, "चला आज अभ्यासाला सुट्टी. आज आपण पोलिस स्टेशनला जाऊ". गणवेषातला पोलिस बघितला की थोडी भीतीच वाटते. एरवी पोलिसांशी बोलण्याची वेळही सहसा येत नाही. पोलिस पकडून तुरूंगात टाकतात असेही कोणीतरी सांगितलेलेच असते. त्यामुळे आज पोलिसांशी बोलायचे आहे असे बाईंनी सांगितल्यावर आम्ही प्रत्येकजण मनाशी काही ना काही ठरवत होतो.



डब्याची सुट्टी झाली नसतानाही वर्गातच डबे खाऊन एक मुलगा-एक मुलगी हात धरून ओळीने शाळेबाहेर पडले. वेळ भरपूर होता म्हणून आधी बाणगंगेचा पूर बघून आलो. पण उत्सुकता होती ती पोलिस स्टेशन बघण्याची, पोलिसांशी बोलण्याची. रस्त्याने जाताना कोणी वेडेवाकडे वागल्यास 'पोलिसांना सांगून तुरूंगात टाकायला लावीन' असा दम एकमेकांना भरत होतो. वर्गातल्या सगळ्यांना धोपटणाऱ्या हेमंतचे नाव नक्की पोलिसांना सांगायचे असेही कोणीतरी म्हणाले. पण पोलिस स्टेशनच्या आवारात गेल्यावर सगळे चिडीचुप. बाई आत जाऊन परवानगी काढून आल्या आणि आत चला म्हणाल्यावर आम्हाला खूप आनंद झाला.

ऑफिसच्या बाहेर चपला काढून, पाटील काकांना नमस्कार करून आम्ही आत जाऊन बसलो. काकांनाही आज रोजच्यापेक्षा वेगळे, म्हणजे मुले पोलिसस्टेशनमध्ये आलेली पाहून आनंद झाला होता. इतरही काही कर्मचारी येऊन दरवाजातून डोकावून जात होते.

आम्ही अजूनही भेदरल्यासारखे इकडे-तिकडे पहात होतो. पण पाटील काकांनी त्यांची ओळख करून देऊन 'पोलिस हे तुमचे मित्र असतात तुम्हाला काय विचारायचे ते विचारा'. असे हसत-हसत सांगितल्यावर भीती पळून गेली आणि सगळ्यांना काय विचारू आणि काय नको असे होऊन गेले.

पण त्यापूर्वी काकांनी पोलिस शिपाई, नाईक, हवालदार, जमादार यांना प्रत्यक्ष बोलावून त्यांच्या युनिफॉर्म आणि हुद्द्या विषयी माहिती सांगितली. पोलिसांच्या टोपीवर लाल पट्टी आणि बटणे असतात, सिंहाची राजमुद्रा असते. त्यांच्या कमरेच्या पट्ट्यावर त्यांचा बक्कल नंबर असतो. गणवेशाच्या डाव्या बाहीवर 'महाराष्ट्र पोलिस' असा बिल्ला असतो व खांद्यावर म. पो. ही धातूची अक्षरे असतात. नाईकांच्या युनिफॉर्मच्या उजव्या बाहीवर दोन लाल पट्ट्या असतात. जमादाराच्या खांद्यावरएकस्टार तर फौजदारांच्या खांद्यावर दोन स्टार असतात.

पोलिसांकडे त्यांचा फोटो असलेले व हुद्दा दाखविणारे ओळखपत्र असते. या सर्व खुणांवरून. आपल्याला त्यांचे हुद्दे समजतात.

होते. तुरुंग म्हणजे उंच भिंती असलेली जागा. आतमध्ये कैद्यांसाठी खोल्या असतात. यामध्ये हे कैदी राहतात. त्यांना दोन वेळा जेवण मिळते व असले तर कामही करावे लागते.

स्नेहल - आमच्यासारखी छोटी मुलेही तुरुंगात असतात का?

पाटील काका -हो तर! काही चोऱ्यामाऱ्या करणाऱ्या गुन्हे करणाऱ्या लहान मुलांसाठी 'रिमांडहोम' असते. तेथे अठरा वर्षापर्यंत मुले ठेवतात. तेथे त्यांनी गुन्हेगारी सोडून चांगल्या मार्गाला लागावे यासाठी प्रयत्न केले जातात.

निकीता - स्त्रिया पोलिस असतात का?

पाटील काका - हो, स्त्री पोलिसांचा युनिफॉर्म असतो खाकी साडी. स्त्री पोलिसांची आवश्यकता असते. स्त्रिया फौजदार किंवा अधिकारीही असतात.आपल्या जिल्ह्याच्या पोलिस अधीक्षक मीरा बोरवणकर यांना तुम्ही पाहिले असेलच.

शोएब - चौकात दिसणारे पांढरा शर्ट आणि खाकी पॅन्टवाले पण पोलिसचं असतात ना?

पाटील काका - हो तेही पोलिसचं ट्रॅफिक पोलिस.वाहतूक नियंत्रित करताना, गर्दीत वेगाने जाणाऱ्या गाड्या आडवताना, मोटरसायकलवरील तिघेजण, दिवा नसलेली गाडी, लायसेन्स नसलेले गाडीवाले, रहदारीचे नियम मोडणारे यांना आडवणारे ट्रॅफिक पोलिस तुम्ही नेहमी पहात असालच.

स्वप्निल - मग पकडलेल्यांना शिक्षा काय होते?

पाटील काका - अठरा वर्षाखालील मुले किंवा बिगर लायसेन्सवाले सापडल्यास त्यांना दंड केला जातो व पुन्हा तसे न करण्याबद्दल ताकीद दिली जाते.

निलांबरी - रस्त्यावरच्या दारूड्यांची मला फार भीती वाटते. त्यांना तुम्ही पकडता का?

पाटील काका - रस्त्यावर दारू पिऊन गोंधळ करणाऱ्यांना आम्ही पकडतोच. त्यांना दंड तर होतोच पण, दोन-तीन दिवस कैदेतही बसावे लागते.

विक्रम - आणखी कुणाकुणाला पकडता?

पाटील काका - दादागिरी करणारे, चोर, दरोडेखोर, खुनी, भुरटे चोर यांना पकडतो. एकदा त्यांना पकडल्यावर त्यांच्या समोरच्या भिंतीवर अशा काही भुरट्या चोरांचे म्हणजे गर्दीत पाकिटे, पर्स, मंगळसूत्रे चोरणाऱ्या लोकांचे फोटो काढतात. ते पहा समोरच्या भिंतीवर काही फोटो लावले आहेत. त्यांच्या हातातील पाटीवर त्यांच्या गुन्ह्याचीही नोंद आहे.

शनी - पण आमच्या गावाबाहेरच्या वस्तीवर चोर आल्यास तुम्हाला कसे कळवायचे?

पाटील काका - आम्हाला १०० नंबरला फोन करून किंवा जर आमच्या गस्तीच्या गाडीच्या लक्षात आलं तर ते ताबडतोब वायरलेसवरून पोलिस स्टेशनशी संपर्क साधून आणखी पोलिस मदत मागवू शकतात. असे सांगून काकांनी वायरलेस यंत्रणेचे काम कसेचालते हेही दाखवले.

रचना - आम्ही मुले पोलिसांना कशा प्रकारे

मदत करू शकतो?

पाटील काका -तुम्हाला समजलेल्या गुप्त गोष्टी कळवून, गुन्हा तुमच्या समोर घडलयास गुन्हेगाराचे वर्णन करून, एखादा ट्रकवाला कोणाला धडक देऊन पळून गेल्यास ट्रकचा नंबर - वर्णन करून, माहिती सांगून तुम्ही मुले पोलिसांना मदत करू शकता. काही गुन्ह्यांमध्ये तुमच्यासारख्या मुलांची साक्षही महत्त्वाची धरली जाते.

गौरी:- काका, मला तुमच्यासारखे फौजदार होण्यासाठी काय करावे लागेल?


पाटील काका - त्यासाठी पदवीधर होऊन सरकारतर्फे घेतल्या जाणाऱ्या स्पर्धापरीक्षा पास व्हावे लागते. यासाठी जनरल नॉलेजची आवश्यकता असते. म्हणून मुलांनो खूप वाचा. आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या घटनांची नोंद ठेवा. एवढेच नाही तर उंची, वजन, शारीरिक पात्रताही आवश्यक असते. त्यासाठी तंदुरूस्त रहा,व्यायाम करा.

फलटण पोलिस स्टेशनचे फौजदार बाजीराव पाटील यांच्याशी अगदी 'शेक-हॅन्ड' करून त्यांचे आभार मानून बाहेर पडल्यावर आमचा आनंद गगनात मावत नव्हता. मिळालेल्या माहितीबद्दल बोलत -बोलत कधी शाळेत आलो ते कळलेच नाही. आता हे सगळे कधी एकदा आमच्या इतर मित्र-मैत्रिणींना सांगतो असे झाले होते.

## मशीन फिरतं

मशीन फिरतं भर भर
कपडे शिवतं सर सर
सुई बसली कपड्यात
बटण आलं तेवढ्यात
बटण म्हणालं भित्री
तेवढ्यात आली कात्री
कात्रीने कापले कट कट
मशीन म्हणाले चल हट
मशीनला आली चक्कर
बटणाशी बसली टक्कर

अमित डोंगरे
इ. २ री ('९८-'९९)



# सच्चे दोस्त

जावेद मणेर इ. २ री ('९७-'९८)

एक था पेड। उसका नाम था बड। एक थी चिडीया। उसका नाम था चिंकी। एक दिन बड का पेड रोने लगा। चिंकीने पूछा, "पेड तुम क्यों रो रहे हो?" पेड बोला मुझे बच्चे नहीं है। एक होगा तो मी चलेगा।" चिंकीको एक तरकीब सूझी। उसने कहा कि "मैं एक फल लाती हूँ। उसे नीचे फेक देती हूँ।" उसने एक फल लाया और उसे जमीनके नीचे गाडदिया। कुछ दिनों बाद उस फलके बीजका अंकुर आया। देखते देखते उसका पौधा बन गया। बडका पेड हँसने लगा। चिंकीने पुछा कि इतना क्यों हस रहे हो? उसने चिंकीको बता दिया कि उसका बच्चा आ गया। और वो दोनो सच्चे दोस्त बन गये।



## एक होते मोठे झाड

एक होते मोठे झाड
त्याचे नाव वडाचे झाड
वडाच्या झाडाला आली बोटे
बोटाला धरुन खेळा झोके
बोटे हाताला येत नाहीत का?
बाबांना उचलून घ्यायला सांगा
पण मुलांनो लक्षात घ्या
पडाल हं घट्ट धरा

जावेद मणेर
इयत्ता ३ री ('९८-'९९)

## पाऊस

गार गार वारा
पावसाच्या धारा
आकाशातून पडतात
छोट्या छोट्या गारा
छोट्या मुलांना
भिजून येतो आजार
आजारामुळे मुले
होतात बेजार.

निशा जगताप
इ. ५ वी ('९८-'९९)

# स्वतःचा इतिहास

धीरज चव्हाण, इ. ८ वी ('९८-'९९)

माझा जन्म २४ ऑक्टोबर १९८५ साली पोळ दवाखान्यात झाला. धीरज हे नाव मला माझ्या मामाने दिले. लाडाने तो मला पिंटू असे म्हणतो.


१९८७ मध्ये माझी आई कमला निंबकर बालभवन या शाळेमध्ये शिपाई म्हणून कामाला लागली. तेव्हा मी दोन वर्षांचा होतो. मी आजी, आजोबा, मामा याच्या सहवासात वाढलो. मामा माझे खूप लाड करायचा. मी जेव्हा बोलायला लागलो तेव्हा पहिल्यांदा मामा हा शब्द उच्चारला.

अडीच वर्षाचा झालो तेव्हा आई मला शाळेत घेऊन जायची. मी एका वर्षात दोन वर्ग केले. मी बालवाडीला होतो तेव्हा मला बाराखडी व १ ते ५० अंक म्हणायला येत होते म्हणून दमूताईंनी प्रथम सत्र झाल्यानंतर मला मधल्या गटात घातले. सगळेजण आईला आशाबाई म्हणायचे म्हणून मी पण आईला 'आशा' याच नावाने हाका मारायचो. आईने मला एकदा खूप मारले तेव्हापासून मी तिला आई म्हणू लागलो.

मला मोठ्या मुलांमध्ये अभ्यास करायला खूप आवडायचे. पण आई मला मुलांच्यात जाऊ द्यायची नाही व हट्टीपणा केला तर पट्टीने मारायची. मला लहानपणी गव्हाची खीर खूप आवडायची. एकदा आजीने मला खीर दिली नव्हती म्हणून मी घरातील चहाचे कप फोडले होते.

आई व वडिलांची खूप भांडणे व्हायची तेव्हा मी पळत जाऊन आजोबांना बोलवायचो. मग भांडणे सुटायची. एकदा मला खूप राग आला होता म्हणून मी दोघांना कोंडून ठेवले होते.

एकेरीवाडी हे माझ्या आजोबांचे गाव. तेथे मी दर वर्षी जातो. शेतातील कामे करतो. एकदा शेतातील मका कापताना माझ्या हाताला विळा लागला होता. मी दररोज म्हशींना चारा टाकायचो. त्यांना पाटातील पाण्याने अंघोळ घालायचो. मी सातवीत असताना पोहायला शिकलो. पोहायला शिकताना मी तीन वेळा बुडलो होतो. मला दर



महिन्याचे सामान आणण्यासाठी मलठणमध्ये चालत जावे लागे. म्हणून आईने मला सायकल घेऊन दिली. दुसऱ्यांच्या घरी दूरदर्शनवरील कार्यक्रम बघायला जायचो, रात्री उशिरा घरी यायचो म्हणून तिने दूरदर्शन संच घेतला. माझे एवढे लाड होतात कारण मी एकटा आहे. मला एक मोठा भाऊ होता पण तो जन्मल्यानंतर दोन तासांनी देवाघरी गेला. मला भाऊ-बहीण असायला पाहिजे होती.

फुटबॉल हा माझा आवडता खेळ आहे. मी आमच्या वर्गाबरोबर साखरवाडीला फुटबॉलची मॅच खेळण्यासाठी गेलो होतो. मी मोठा झाल्यावर सैनिकांमध्ये भरती होणार कारण मला आपल्या देशासाठी काहीतरी काम करायचे आहे.

माझा विरंगुळा म्हणजे आजीचे घर. तेथे मला खूप मित्र आहेत. तेथे गेल्यावर मला खूप आनंद मिळतो. तेथील मुले देखील मला पिंट्या या नावानेच बोलावतात. माझे पुढचे दोन दात पुढे आहेत म्हणून ती मुले कधी-कधी मला तात्याविंचू, फड्या अशा नावाने चिडवतात. मी त्यांना काहीही बोलत नाही. मोठे दात ही देखील निसर्गाचीच देणगी आहे. आम्हा मुलांना गोट्या खेळायला खूप आवडतात. या शिवाय क्रिकेट, भोवरे इ. खेळही आम्ही खेळतो.

(पान १२ वर क्रमशः)

# जिरवली खाशी

मधुरा राजवंशी, इ. ८ वी ('९८-'९९)



(तीन चिमण्या शेताकडे पहात असतात.)

चिमणी १ : चला ग चला शेताकडे चला. धान्य खूप खायचंय मला

चिमणी २ : नको ग अशी अधाशी होऊस. हातात काठी घेऊन उभा तेथे माणूस

चिमणी १ : पण रोज मी पाहते तो तिथेच असतो. ना खातो ना पितो ना हसतो ना बसतो. मानवाला तर कधी स्वस्थ नाही बसवत. हा मनुष्य आपल्याला नाही ना ग फसवत?

चिमणी २ : असे असेल तर जाऊनच पाहू. नसेल कोणी तर धान्य खाऊ.

चिमणी ३ : नको ग नको मला वाटते भीती. सोडायचा नाही जर लागलो त्याच्या हाती. शोधू आपण दुसरीच शेती, दुसरंच धान्य नि दुसरीच माती.

चिमणी १ : कशी ग बाई तू एवढी घाबरट? व्हायला शीक जरा तरी धीट.

चिमणी ३ : असं जर म्हणताच आहात तुम्ही चला पुढे मग येते मागून मी.

चिमणी१,२ : चल ग चल (तिघी तेथे जाऊन पोहोचतात.)

चिमणी १ : हातपाय म्हणजे दिसतयं नुसतंच लाकूड

चिमणी २ : शरीर याचं असं कसं वाकूड?

चिमणी ३ : डोकं म्हणजे वाटतोय नुसताच दगड.

चिमणी १ : माणूस नाही हा पुतळा अस्सल. फसवलं फसवलं माणसानं फसवलं.

चिमणी २ :साऱ्या चिमण्यांना फसवल्याबद्दल माणसाला घडवू चांगलीच अद्दल.

चिमणी ३ :साऱ्या चिमण्यांना जाऊन सांगू. माणसाला अद्दल घडवायला मदत मागू. (तिघी जातात.)

चिमणी १ :मिनी, टिनी , रिनी, पिनी इकडं या गं साऱ्याजणी.

चिमणी ४ :काय गं झालं? का आल्या एवढ्या घाईन? गरुड राजाचं का आलं आहे बोलावणं?

चमणी २ :नाही ग बाई, कसलं आलंय बोलावणं? पण आपल्याला फसवलं माणसानं. शेतामध्ये ठेवूनी बुजगावणं. चांगलंच बनवलं आपल्याला त्यानं.

चिमणी ३ :मानवाची आता मोडूच खोड. बुजगावण्याची करू तोडफोड.

चिमणी ४ :चला ग चला. (सर्व चिमण्या जातात.)

चिमणी ४ :करू या पुतळ्याची नासधूस, काढू त्याच्या कपड्यातील कापूस आपल्याला बनवलं, आपल्याला फसवलं, आठवडाभर उपाशी ठेवलं, शेतात शिरू, पिकांना फस्त करू. येईल तेवढी नासधूस करू. (नासधूस करुन चिमण्या जातात. शेतकरी येतो.)

शेतकरी : हे असे कसे झाले? हे असे कसे झाले? बुजगावण्या तू तुझे काम नाही केले. तू येथे पडला आहेस मस्त. तिकडे चिमण्या करून गेल्या शेत सारे फस्त.

चिमण्या : कशी.. कशी... कशी... कशी......... मानवाची या जिरवली खाशी जिरवली खाशी. (हसत हसत निघून जातात.)

# पुढच्यास ठेच मागचा शहाणा

कौस्तुभ वाच इ. ८ वी ('९८-'९९)


दिवाळीची सुट्टी लागली. मी मामाच्या गावाला गेलो. एकदम दोन वर्षानंतर जात असल्याने मला माझ्या गावाकडच्या मित्रांना भेटायची घाई झाली होती. सकाळी बाकी सगळे भेटले. पण सुरेश काही भेटला नाही. बाकीच्यांना विचारले तेव्हा त्यांनी सांगितले की त्याचा पाय मोडलाय. मी लगेच सुरेशचे घर गाठले. तो अंगणातच बसला होता. शेजारी कुबड्या होत्या. मी त्याला विचारले,"काय झाले रे सुरेश?" सुरेश सांगू लागला, "मला चांगल आठवतं की मी एक ते दीड वर्षापूर्वी चांगला ठणठणीत होतो. त्यावेळी मी नुकताच आठवीत गेलो होतो. आमची शाळा सुरू झाली त्यावेळी माझा मित्र 'आनंद' याचा हात फ्रॅक्चर झालेला मला दिसला. तेव्हा मी व माझ्या मित्रांनी काय रे झाले हाताला असे नेहमीच्या स्वभावानुसार विचारले. आनंद म्हणाला, ही माझी अवस्था शक्तिमानची नक्कल केल्यामुळे झाली आहे. मित्रांनो, मी ही चूक केली. पण तुम्ही अशी चूक करू नका." त्याच्या बोलण्याकडे आम्ही मुळीच लक्ष दिले नाही.

एक दिवस गेला दुसऱ्या दिवशी प्रार्थनेच्या वेळी शाळेच्या मुख्याध्यापकांनी सुध्दा आम्हाला शक्तिमानच्या नकलेच्या परिणामांच्या लहान मोठ्या घटना सांगितल्या. पण आम्हाला शक्तिमान आवडायचा म्हणून आम्ही त्यांच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केले.

"एक आठवडा गेला. एक-दोन महिने गेले. 'शक्तिमान' बद्दल विषय झाला नाही. रविवार म्हणजे सुट्टीचा दिवस. त्या दिवशी आम्ही आमचा बंगला बघण्यास गेलो. प्रथम मी माझ्या मित्रांना खालच्या मजल्याची माहिती करून दिली. नंतर आम्ही वरच्या मजल्यावर गेलो. तेथील बांधकाम अपूर्ण होते आम्ही तिथेच सतरंजी टाकून बसलो. प्रथम डबा खाल्ला. तेव्हा परेशने काल झालेल्या 'शक्तिमानचा' विषय काढला. सर्वजण म्हटले "कोण सर्वात जास्त चांगली शक्तिमानची नक्कल करून दाखवेल?" तेव्हा मी नक्कल करण्यास तयार झालो. मी गोल फिरलो. फिरत फिरत मी बंगल्याच्या बाजूला आलो. एकदम माझे मित्र ओरडले 'सुरेश थांब.' 'सुरेश थांब!...' पण छे....

"तेवढ्यात तोल गेला आणि डोळ्याची पापणी लवते न लवते तोच मी खाली सिमेंटच्या विटावर कोसळलो. माझे मित्र खाली आले पण माझे आईवडील रागावतील म्हणून पळून गेले. पळून जाणारी ती मुले! खरे मित्र कसले?"

शेजारच्या बंगल्यात एक कामगार काम करीत होता. त्याने मला पाहिले व माझ्याकडे धावत आला. त्याने मला दवाखान्यात नेले. खूप दिवस उपचार करूनही माझ्यात फरक पडला नाही. त्यामुळे



डॉक्टरांनी माझ्या आईवडिलांना सांगितले की सुरेश कधीही चालू किंवा स्पष्ट ऐकू शकणार नाही. कारण खुब्याचे हाड तुटले आहे व कानाच्या पडद्यावर आघात झाला आहे."

माझा बालमित्र सुरेश परत खेळू, पळू, पहिल्यासारखी मजा करू शकणार नाही.म्हणून मी कळकळीने सगळ्यांना सांगतो की कधीही शक्तिमानची ॲक्टिंग करू नका. कारण ही सर्व कॅमेऱ्याची, कॉम्प्युटरची कमाल आहे. हे काल्पनिक आहे आणि काल्पनिकच राहणार आहे.

# जाई निंबकर ह्यांची मुलाखत

शब्दांकन : आशाताई रूद्रभटे
माध्यमिक शिक्षिका

शाळेमध्ये नव्यानेच सुरू केलेल्या 'बुक - क्लब' मध्ये वाचन, चर्चा, लेखन, परीक्षण, कविता वाचन असे विविध उपक्रम घेतले जातात.

आमच्या परिसरातील एक लेखिका 'श्रीमती जाई निंबकर' यांना विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी आम्ही बोलावले. सभा-भाषणांपासून चार हात दूर राहणाऱ्या, ओरिएण्ट लॉंगमनसारख्या प्रथितयश आंतरराष्ट्रीय प्रकाशकाकडे पुस्तके छापणाऱ्या, लेखनाचे कारखाने न काढता मोजकंच परंतु दर्जेदार लेखन करणाऱ्या या लेखिकेला कसं बोलवायचं? असा विचार करीत आम्ही शेवटी त्यांच्या घरी जाण्याचं धाडस केलं. गावाबाहेर चिक्कू, पेरूच्या दाट बागांच्यात दडलेलं जांभा दगडाचं घर मोठं रम्य दिसत होतं. जाई निंबकर आम्हाला बाहेर चिक्कूच्या बागेतच भेटल्या. खादीचा कुर्ता आणि जीनची पॅंट घालून केसाला स्कार्फ बांधून त्या चिक्कू काढीत होत्या. आम्हालाही काही पाडाचे चिक्कू खायला मिळाले. आम्ही घाबरत घाबरत त्यांना आमंत्रण देताच त्या खळखळून हसल्या. म्हणाल्या, "अरे मुलांनो, मी काही मोठी लेखिका वगैरे नाही. पण तुमची इच्छा असेल तर जरूर येईन मी. सांगा केव्हा येऊ."

आम्ही लगेच त्याच शनिवारची तारीख पक्की केली. आमच्या विनंतीस मान देऊन त्या शाळेमध्ये शनिवार दि. २३ जानेवारी रोजी आल्या आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

त्या स्थानापन्न होताच विद्यार्थ्यांनी प्रश्नांचा वर्षाव सुरू केला आणि त्याला समर्पक उत्तरेही त्यांनी दिली. ती अशी :-

***आपण लेखिका व्हायचं असं अगदी लहानपणापासूनच ठरविलं होतं का?***
हो! मला लहानपणापासूनच लेखिका व्हावं असं वाटायचं. आपल्याला जे काही वाटतं ते शब्दात लिहिणं व त्याला कल्पनेनं आकार देणं म्हणजे लेखिका होणं मात्र मी लहानपणी लिहायला सुरवात केली नाही.

***लेखिका होण्यासाठी काय करावे लागते?***
लेखिका होण्यासाठी डोळे, कान व मन उघडे ठेवून जगावे लागते. म्हणजे वास्तव जगाच्या घटनांना कल्पनेनं सजवून साहित्यनिर्मिती करता येते.

***लेखनासाठी पालकांचे प्रोत्साहन व मार्गदर्शन होते का? आपले लेखन पालकांना वाचायला देत होतात का?***
मार्गदर्शन नाही. मत्र घरी काहीही करायला मोकळीक असल्याने अडथळा निर्माण झाला नाही. आणि मी खूप उशिरा लिहिण्यास सुरवात केली. त्यामुळे पालकांना साहित्य वाचायला देण्याचा प्रश्नच उद्भवला नाही.



***तुम्ही डायरी लिहीत होतात का?***
हो. मी डायरी लिहिते. कधी कधी विसरतेही. पण परत लिहिणे सुरू करते.

***तुम्हाला लिखाण कसं सुचतं?***
लेखकानं नेहमी कान, डोळे व मन उघडं ठेवून वावरायला पाहिजे. तेव्हा रस्त्यानं जाता जाता आपल्याला एखादा माणूस दिसला. तो स्वतःशी एकदम हसला तर खुळचटच आहे म्हणून सोडून न देता तो का हसला असावा? असा विचार करावा. त्याला काही दिसलं म्हणून की आठवलं म्हणून? असा विचार केला तर एखादी गोष्ट सुचते.

***तुम्ही भयकथा लिहिल्या आहेत का?***

नाही. माझ्या एका गोष्टीत एका खुनाचा उल्लेख आहे. पण त्यातही मानवी संबंधावर अधिक लक्ष केंद्रित केले आहे.

*प्रामुख्याने लिखाण कोणत्या भाषेतून केले?*
प्रामुख्याने लिखाण इंग्रजी भाषेतून केले.

*का?*
कारण मला इंग्रजी वाङ्मय जास्त समृध्द वाटलं. त्यातूनच त्या भाषेत लिहिण्याची गोडी लागली. आपलं लेखन जास्तीत जास्त लोकांनी वाचावं सर्व देशांत वाचावं. म्हणूनही इंग्रजीतून लिहिलं.

*सर्वात प्रथम कोणतं साहित्य लिहिलं?*
सगळ्यात प्रथम 'टेंपररी आन्सरस्' ही कादंबरी लिहिली.

*लिखाण अनुभवात्मक का काल्पनिक असतं?*
अनुभवानंतर लिखाण सुचतं व त्यातील पात्र व त्यांचे संवाद काल्पनिक असतात. तसचं जे जे पुस्तकात छापलं जातं ते १००% खरं असतचं असे नाही.

*तुम्ही कुठे बसून लिहिता?*
मी जास्त करुन घरात टेबल खुर्चीवर बसून लिहिते.

*कविता लिहिता का?*
नाही.

*का?*
कारण कविता करणं हा माझा पिंडच नाही. कविता करणं मला आवडत नाही. गदय लिहिणं जास्त आवडतं.

*एखादी कल्पना सुचल्यानंतर लगेच लिहून काढता का?*
एखादी कल्पना सुचल्यानंतर ती बरेच दिवस मनात घोळवते व पात्रांची कल्पना आल्यावर लिहून काढते.
*तुमच्या काही कादंबऱ्यांची नावे सांगाल का?*
टेंपररी आन्सरस्, जॉइंट व्हेंचर, ॲलिस, साथ, कम रेन, फॅन्टम बर्ड इ.
*आता पर्यंतच्या आपल्या लेखनातील सर्वात अधिक आवडलेलं लेखन कोणतं?*
आतापर्यंतच्या स्वतःच्या लेखनातील माझी 'टेंपररी आन्सरस्' ही कादंबरी आवडते. कारण ती माझी पहिली कादंबरी आहे.

*मासिकं, वर्तमानपत्रातून लेखन केलं आहे का?*
हो. मी किर्लोस्कर, स्त्री, सत्यकथा या मासिकांतून व वर्तमानपत्रातूनही लेखन केलं आहे.

*आपण कोणत्या प्रकारचं वाचन करता?*
मी वर्तमानपत्र वाचते. मराठी साहित्य वाचते. इंग्रजी वाङ्मय लहानपणापासूनच वाचते.

*तुमचे आवते लेखक/लेखिका कोणत्या?*
आवडते लेखक/लेखिका :- श्री. ना. पेंडसे, मेघना पेठे, राजन गवस इ.

*स्वतः लिहिलेलं लेखन प्रकाशित झाल्यावर वाचता का?*
नाही. मात्र प्रकाशित होण्यापूर्वी वाचते.

*एखादं पुस्तक आवडलं तर पुन्हा पुन्हा वाचता का?*
हो वाचते. पण पारायण केल्याप्रमाणे वाचत नाही. तर बऱ्याच काळानंतर पुन्हा केव्हा तरी.

*तुमच्या एखाद्या पुस्तकास अभ्यासासाठी लावले आहे काय?*
हो. कॉलेजला एका वर्षी टेंपररी आन्सरस् लावलं होतं.

*वाचनातून लेखनाची प्रेरणा मिळते का?*
हो कधी कधी, परंतु वाचलेल्या पुस्तकांतूनच विचार घेऊन लिहीत नाही.

*कोठे बसून वाचन करायला आवडते?*
बैठकीच्या खोलीत लोडाला टेकून वाचायला आवडते.

*वाचन, लिखाणापैकी जास्त काय आवडते?*
वाचन जास्त आवडते. लिखाणाचा कंटाळा येतो.

*लिखाणासाठी पी. ए. ठेवला आहे का?*
नाही, मी स्वतःच लिहिते.
*लेखन टंकलिखित का हस्तलिखित?*
इंग्रजी लेखन मी टाईप करते व मराठी लेखन हस्तलिखित.
*तुमच्या लेखनात तुम्ही काही रेखाटने करता?*
नाही.
*तुमचे छंद कोणते?*
मला पक्षीनिरीक्षणाचा छंद आहे. पण पक्ष्यांबद्दलचे ज्ञान विस्तृत नाही.

*लेखन, वाचन, घरकामातून छंद जोपासता का?*
हो. जमलं तर जोपासते.
*टी. व्ही. पाहता का?*
हो पाहते. चांगल्या सिरियलस् असतील तर पाहते. 'कोवळी मने' सिरियल पाहत होते. बातम्या ऐकते.
*कुमारांसाठी आपण काही साहित्य लिहिलं आहे काय?*
माझा तसा विचार होता. पण अजून तरी लिहिलं नाही.
*लिखाणात तुमचे गुरू कोण?*
कोणी नाही.
*आपण पुस्तक परीक्षण केलं आहे काय?*
हो. परीक्षणासाठी माझ्याकडे पुस्तके येतात.
बऱ्याच पुस्तकांची परीक्षणे केली आहेत.

*परीक्षणे करायला आवडते काय?*
होय. परीक्षणाचा एक महत्वाचा फायदा होतो. तो म्हणजे वाचन वाढविण्याचा. परीक्षणामुळे नाना तऱ्हेच्या पुस्तकांचे वाचन होते. तसेच जास्त डोळसपणे वाचायची सवय लागते.

*पुस्तक परीक्षण म्हणजे काय?*
आपल्याला पुस्तक कसं भावलं हे सांगणं म्हणजे पुस्तक परीक्षण करणं आहे. पुस्तकाचे कथाबीज, भाषाशैली, छपाई, लेखकाचे मन कितपत उतरले आहे, कितपत प्रभावशाली ठरले आहे यावर परीक्षण करताना विशेष भर दिला जातो.
*पुस्तक परीक्षण का करावे?*
पुस्तक परीक्षण करताना गोष्टी अधिक चांगल्या रीतीने वाचल्या जातात.

*आपण आपल्या आई 'इरावती कर्वे' यांच्या पुस्तकांचे परीक्षण केले आहे काय?*
नही. पण इतरांनी ते केलं आहे.
*तुमच्या पुस्तकांना पुरस्कार मिळाला आहे काय?*
हो. फक्त एकच. नाशिकच्या वाचक मंडळाकडून कथा लेखनाचा पुरस्कार मिळाला.

*वाचकांकडून काय प्रतिसाद मिळतो?*
एखादी कादंबरी आवडल्यास अथवा एखादा प्रसंग आपल्या जीवनाशी अथवा अनुभवांशी जवळचा वाटला तर तसे सांगणारी पत्रे येतात. कधी कधी टीकाही होते.

*आम्हा मुलांच्या प्रश्नांना उत्तरे देताना तुम्हाला कंटाळा नाही ना आला?*
छे. उलट मोठ्या माणसांच्या प्रश्नांपेक्षा तुमचे प्रश्न वेगळे वाटले. म्हणून गंमतच वाटली.

हसत हसत जाई निंबकर उद्गारल्या. बघता बघता तास उलटला होता. तेव्हा आमचे प्रश्न आम्ही आवरते घेतले आणि त्यांचा निरोप घेतला.

आणि अशी झाली ती मुलाखत.

**(स्वतःचा इतिहास पान ७ वरून)**

मला निसर्गात फिरायला खूप आवडते. मी दरवर्षी धुमाळवाडीला धबधबा, तेथील परिसर बघण्यासाठी जातो. बोरे खातो. धबधब्याच्या पाण्यात पोहतो. निसर्गाची आवड असल्याने मी 'डब्लू डब्लूएफ' या निसर्ग मंडळात भाग घेतला आहे.

निसर्ग मंडळात प्राणी-पक्षी यांबदल चर्चा होते. मी खूप झाडे लावलेली आहेत. मी, आणि माझे मित्र मिळून त्यांना पाणी घालतो.

या शाळेने मला खूप काही दिले. आजच्या माझ्या यशात मॅक्सिन आजी, मंजूताई, शिक्षक आणि माझे मित्र यांचा फार मोठा वाटा आहे. म्हणून मी सर्वांचा अत्यंत ऋणी आहे.

# आठवणीतील साने गुरूजी

नेहा नेवसे इ. ८ वी. ('९८-'९९)



साने गुरूजी हे एक देशभक्त व थोर लेखक होते. स्वातंत्र्य चळवळीतील असंख्य तरुणांचे ते स्फूर्तिस्थान होते. या साने गुरूजींना लहानपणी गरिबीचे चटके बसले. अशा या हालाखीत दिवस काढलेल्या साने गुरूजींची यशोगाथा पाहूया.

■ रत्नागिरी जिल्ह्यातील पालगड या ठिकाणी २४ डिसेंबर १८९९ रोजी साने गुरूजींचा जन्म झाला. त्यांचे नाव पांडुरंग सदाशिव साने असे होते. त्यांच्या आईचे नाव यशोदा होते. लहानपणापासूनच गुरूजींचे आपल्या आईवर अतोनात प्रेम होते. आईच्या संस्कारामुळे ते स्वाभिमानी झाले होते. आपल्यापेक्षा जे गरीब आहेत त्यांच्यावर प्रेम करावे, त्यांचे अश्रू पुसावेत ही शिकवणही पांडुरंगाला आईनेच दिली होती. पांडुरंगाचे प्राथमिक शिक्षण पालगडला झाले. पुढील शिक्षणासाठी ते दापोलीला गेले. शाळेत 'हुशार विद्यार्थी' म्हणून चमकू लागले. 'कवी' म्हणून शाळेत त्यांची कीर्ती पसरली. पुढे ते स. प. महाविद्यालयात शिकत असतानाच त्यांनी थोरांची चरित्रे वाचली. त्यांनी भरपूर मराठी आणि इंग्रजी साहित्य वाचले. त्यांचे मन ग्रंथालयात रमत असे. या वाचनातून त्यांची बुध्दी धारदार झाली.

एम. ए. झाल्यावर ते अंमळनेरला नोकरी करू लागले. काही दिवसांतच त्यांनी स्वातंत्र्य चळवळीत उडी मारली. १९३० मध्ये धुळे जेलमध्ये असताना ते खानदेशातील सहकारी राजबंद्यांचा अभ्यासवर्ग घेत. त्यामुळे त्यांचे सहकारी त्यांना 'गुरूजी' म्हणून संबोधू लागले. त्यामुळेच ते महाराष्ट्रचेही 'गुरूजी' बनले. जेलमध्ये त्यांना विनोबा भावे भेटले. विनोबांची गीतेवर प्रवचने होत असंत. गुरूजींची त्यांच्यावर अतिशय श्रध्दा बसली. १९३२ मध्ये स्वातंत्र्य आंदोलनात पुन्हा त्यांना शिक्षा झाली. तुरुंगात दररोज ते आपल्या सहकाऱ्यांना लहानपणीच्या आठवणी सांगू लागले. १९३८ साली त्यांनी 'कॉंग्रेस' या नावाचे साप्ताहिक सुरू केले. साने गुरूजींची कॉलेजमध्ये असताना आणि नंतरही केलेली ज्ञानोपासना, स्वातंत्र्य चळवळीतील त्यांचे समर्पण यामधून अनेक लोकांच्यात सामर्थ्य निर्माण झाले. गुरूजींचे आणखी एक मोठे कार्य म्हणजे आंतर-भारतीची स्थापना करण्याचे प्रयत्न. प्रांता-प्रांतामधील लोकांनी परस्परांच्या भाषा शिकाव्यात,चालीरीती समजावून घ्याव्यात यासाठी आंतर भारतीचा प्रयोग करून घेण्याचे ठरले.

गुरूजींनी अफाट, विपुल वाङ्मय लिहिले. कादंबऱ्या, लेख, काव्य, चरित्रे इत्यादी साहित्यात त्यांची लेखणी सतत चालत होती. त्यांच्या या वाङ्मयातून स्नेहाचा, प्रेमाचा वर्षाव झाला. त्यांच्या मनात राजकीय, सामाजिक व शैक्षणिक विचारांचे, भावनांचे जे जे कल्लोळ उठले ते सर्व त्यांनी आपल्या लेखणीतून उतरविले. त्यांनी आपल्या वाङ्मयाला विचारांनी, भावनांनी, वर्णनांनी नटवले आहे. बालकांसाठी गोड-गोड गोष्टी, कुमारांसाठी चरित्रे व लेख आणि माता-भगिनींसाठी संस्कारक्षम लेख त्यांनी लिहिले. या विपुल वाङ्मयातील त्यांची तेजस्वी रत्ने म्हणजे 'श्यामची आई' व 'श्याम' ही पुस्तके.

असे हे थोर साहित्यिक,विचारवंत व देशभक्त १० जून १९५० साली हे नश्वर जग सोडून गेले.

# दुष्काळ आणि शेतकरी

संग्राम राऊत इ. ९ वी ('९८-'९९)



काय हे! काय हे! आम्हास्नी प्यायला पानी न्हाय! मग शेतीला कुठून पानी? काय म्हनावं या दुष्काळालाबी? जिथं कॅनॉल, नदी, नाळं, वढं तिथलं आमचं भावबंद सुखी हायेत.

जिथं पानी पोहचलं न्हाय तिथं दुष्काळाची बोंबाबोंब हाय. पानी न्हाय म्हणल्यावर आमी धान्य कुठनं पिकवणार? कोरड्या जमिनीत? आमी शेतकरी लोकांनी खायचं काय? आमची पोटं हातावरची हायती. कायबाय पिकलं तरच खाया मिळतं. नायतर कुठून मिळायचं? आमी शेतात काबाडकष्ट केले आन् पानीच न्हाय मिळालं तर त्या मेहनतीचा काय उपेग?

ही ही सगळी इंज्ञानाची करणी हाय. त्यापायी लोक झराझरा झाडं तोडाया लागली. त्यामुळं आता हा दुष्काळ आमाला भोगाया लगतुया. पावसाचा एक थेंब नाय. काय म्हणाव या देवाला? यानी थोडीबी दया दाखविली नाय आमावर.

परत्येकजण आमाला 'अन्नदाता' म्हणत्यात पर आज अन्नदात्यालाच अन्न न्हाय मग रयतेला कुठनं मिळायचं? आता आम्हाला या मोठ्या दुष्काळातून कोण वाचवणार? कोण?

ह्या सरकारलाबी कसं कळंना? त्याच्या हातात सत्ता हाय पर झाडं वाचवाया कायदा का करंना? आन् जरी कायदा केलाया पर लोकं त्यो पाळत्यात का न्हाई ते कुठं सरकार बघतुया?

निस्तं जाइराती देतंया पानी वाचवा! पानी वाचवा! आरं म्या म्हनतो कुणीतरी जाऊन त्या सरकारलाच वाचवा, आता नाहीतर आमी सारं शेतकरी एक झालो तर सरकारचं काय खरं न्हाई म्हणावं.

■

## फुलपाखरू

इवल्याशा फुलपाखरामध्ये
आहे किती नाजूकपणा.
पंखाला मी हात लावला
तर एक पंख तुटून पडला.

निशा जगताप
इ. ५ वी ('९८-'९९)

# क वि ता

## मंत्री

मंत्री एक नाव असतं.
टेबलाखालून पैसे घेणं हेच त्याचं काम असतं.
ओळख असली तर काही आडत नाही.
ओळख नसली तर मात्र काम होत नाही.
मतदान होतं निकाल लागतात.
सगळीजण गुलाल उधळू लागतात.
निवडणुकी आधी मंत्री आश्वासन देतो काही.
निवडून आल्यावर ओळखही दाखवत नाही.
मंत्री असतो एक बोका.
भ्रष्टाचार करून देशाला देतो धोका.
भ्रष्टाचार करताना त्याला नसतं भान.
सापडला की मात्र.
पैसे लपवायला कमी पडतं रान.
मंत्री भ्रष्टाचार करत नाही?
मग CBI का घालतात त्यांच्या घरावर धाडी?
मंत्री खरचं काय असतो?
भ्रष्टाचाराचं मूळ असतो, पांढऱ्या कपड्यात
लपलेला काळा चोर असतो.
पैसे ओढणारं खोरं असतो, न्यायाच्या मार्गानं
अन्याय करणारा गुंड असतो.
मंत्री असतो आश्वासन देणारं मशीन.
पुरी ही करत नाही, खुर्ची ही सोडत नाही.

गिरीश फणसे
इ. १० वी ('९६-'९७)



## एक जुने घर

एक होते मोठे घर
खूप जुने
त्याला फार वर्षे झाली
किती वारा, किती पाऊस
तरी ते पडेनासे झाले
त्या घराचे मालक आले
घराबद्दल भांडू लागले
एके दिवशी काय झाले
ते घर पडून गेले
मालक लागले रडू
घर लागले हसू.

गणेश लोंढे
इ. ७ वी ('९७-'९८)

# शाळा

प्रशांत वायसे, इ. ८ वी ('९८-'९९)




तांबडं फुटलचं नाही कारण आकाशात काळ्या ढगाचं वास्तव्य अजूनही होतंच. काल रात्रीपासून ते अजूनपर्यंत व अजून काही काळ राहणार होतं. रात्री पाऊस चांगलाच पडला होता आणि म्हणूनच रस्त्यानी जाणारी शाळकरी मुले आपला गणवेश खराब होऊ नये म्हणून नीट जात होती पण तरीही त्यांचे प्रयत्न निष्फळच ठरत होते.

शांत असणारी शाळा या पाखरांच्या किलबिलाटाने हळूहळू एखाद्या अशांत मुलासारखी बनू लागली होती. मुले मित्राशी गप्पा मारण्यात अगदी दंग झाली होती. राहिलेला गृहपाठ पूर्ण करत काही मुलं आपापल्या वर्गातच बसली होती. मध्येच एखाद-दुसरा वांडगा मुलगा येई व काही चित्रविचित्र प्रकारानं त्यांचे लक्ष वेधून घेई. मग मात्र चिडाचिडी, आरडाओरडा आणि यातून भांडणे निर्माण होत व एका वर्गातच दोन गट पडत असत.

यातच घंटा झाली. मुले प्रार्थना हॉलमध्ये जात होती. आत जाऊन उभी राहून किंवा रांगेत ओळीत बसून जोरजोरात गप्पा मारत होती. शिक्षकांचे सावधान विश्राम चालू होते पण मुलांचे लक्ष गप्पा मारण्यातच. त्या प्रार्थनाहॉलला रोजच्यासारखेच आजही एखाद्या बाजाराचे स्वरूप आले होते. शेवटी ज्याप्रमाणे पोलिसांना अश्रुधुराचा उपयोग करून दंगल शांत करावी लागते त्याप्रमाणे शिक्षकांना मध्येच एखाद्या मुलाला उभे करून तो गोंधळ थांबवावा लागे आणि आजही तसेच झाले आणि मग मात्र मुलांचा गोंधळ थांबला. प्रार्थना सुरू झाली व संपली. बातम्याही संपल्या. शाळेचा गणवेश न घातलेल्या मुलांना मात्र शिक्षकांनी आज घरी पाठवायचे रद्द केले कारण नुकतीच पावसास सुरवात झाली होती.

सरांनी पटकन वर्गात जाण्यास सांगितले पण तरीही मुले थोडी फार भिजलीच. मुले वर्गात येत होती तोपर्यंतच एखादा रेकॉर्ड केलेला टेप पुन्हा ऐकावा त्याप्रमाणे आशाबाईंचा रेकॉर्ड टेप सुरू झाला. "मुलांनो, चपला बाहेर काढा. नाहीतर मी चपला फेकून देईन." ज्यांनी चपला काढल्या नव्हत्या ते निमूटपणे बाहेर चपला काढून जागेवर येऊन बसले. होमरूमचा तास सुरू झाला. वर्गशिक्षक वर्गात आले. हजेरी घेतली मग गप्पाटप्पा करण्यातच तास संपला आणि मग रोजच्याप्रमाणे अभ्यासाचे तास सुरू झाले.

टण् घंटा झाली की एक सर बाहेर जाऊन दुसऱ्या वर्गात जात व दुसऱ्या बाई वर्गात येत होत्या.

टण् टण् टण्..... घंटा झाली. मुलांनी दप्तरे आवरली. पटकन डबे घेतले. पाऊस उघडला होता पण त्यामुळे तयार झालेल्या चिखलात स्वतःला सावरत एखाद्या पिंजऱ्यातून पक्ष्यांचा थवा जसा एकदम बाहेर यायला धडपडतो त्याप्रमाणे मुले दरवाज्यातून बाहेर यायला धडपडत होती. हात धुतले. काहींचे डबे येणार होते ती मुले बाहेर उभी होती. मग हळूहळू ती सर्व जेवण्याच्या हॉलमध्ये जमू लागली. पुन्हा पाखरांच्या किलबिलाटासारखा चिवचिवाट सुरू झाला. शेवटी सरांनी शांत केल्यावर मुलांनी प्रार्थना म्हणून डबे उघडले व जेवणास सुरुवात केली.

मिनिटात डबे खाऊन मुले मैदानावर हजर! डबा खातात की नाही कोण जाणे? मग सर्व शाळा मुलांच्या खेळण्यातील धावपळीमुळे गजबजलेली दिसू लागली. सर पेपर वाचण्यात मग्न झाले होते. पारावरती दहावीच्या मुली, पाईपवर दहावीची मुले, मैदानावर खेळणारी छोटी-मोठी मुले-मुली.

टण् टण् टण् टण्...... पुन्हा घंटा. व मुले घोळक्याने वर्गात शिरू लागली, पुन्हा तास सुरू झाले. सरांची ये-जा पुन्हा चालू झाली.

शेवटच्या तासाला मात्र पूर्ण शाळा टीव्ही हालॅमध्ये जमली कारण आज ६ ऑगस्ट होता ना! याच दिवशी बरोबर ५३ वर्षापूर्वी अमेरिकेने जपानच्या हिरोशिमा व नागासाकी या शहरांवर अणुबॉंब टाकले होते.

( पान २१ वर क्रमशः)

# समाजसेवेचा कँप

माणिक शितोळे, इ. १० वी ('९८'-९९)

यावर्षी आमच्या शाळेत समाजसेवा हा वेगळाच विषय सुरू केला. आम्हा सर्वांची तोंडे बघून सरांनी जाणलं असावं की हा विषय काही मुलांना आवडलेला नाही. बहुतेक म्हणूनच वर्षाच्या शेवटी जो समाजसेवेचा कँप घेतात तो आधीच घेण्याचा सरांनी निर्णय घेतला. एक दिवसासाठी आणि तोही विंचुर्णीला! आम्हा सर्वांना खुपच आनंद झाला.मुलांचा आनंद पाहून सरांनाही बरे वाटले. तेथे रात्री शेकोटीचा कार्यक्रम होणार होता.सरांनी मुलांचे गट तयार केले. आम्हा मुलांची जिज्ञासा वाढतच होती.

ज्या दिवसाची मी आतुरतेने वाट पहात होतो



अखेर तो दिवस उजाडला. माझ्या सर्व आवश्यक सामानासह मी सकाळी सात वाजता शाळेत आलो. पण ठरल्याप्रमाणेच ठरलेली मुले उशिरा आली. ठीक सात वाजता जायचे होते खरे पण निघालो मात्र साडेसातला. अर्धा-एक-तास उशिरा निघणे हे नेहमीचेच.

विंचुर्णी फलटणपासून तसे जवळच असल्याने आम्ही चालत चालत निघालो. रस्त्याच्या दुतर्फा बोरांची झाडे भरपूर असल्याने बोरांनी भरलेल्या झाडांवर आम्ही तुटून पडायचो. रस्ता कधी संपला ते कळलेच नाही. बघता बघता आम्ही आमचे शिखर (विंचुर्णी) गाठले.

विंचुर्णीचा निसर्ग मनाला भिडणारा होता. सर्वत्र हिरवेगार दिसत होते. तेथील हरित परिसर कधीही विसरणार नाही.

आमच्या कँपला आता खऱ्या अर्थाने सुरवात झाली. आमच्या सर्वांतर्फे अश्विनने मंजुताईंना फुले देऊन समाजसेवेचा प्रारंभ केला.

सरांनी नित्याप्रमाणे पुन्हा दोन गट केले. मी शेळ्यांच्या अभ्यास गटात होतो.

शेळ्यांच्या पिलांना वजन करण्यासाठी हातात पकडून नेताना मी एक विलक्षण आनंद अनुभवला. तसेच थोडीफार भीतीही वाटली. पिलांना बाटलीने दूध पाजताना मात्र मजा वाटत होती. बहुतेक पिल्ले दूध पिताना शेपटी हलवत होती. हा सारा प्रकार मी तरी पहिल्यांदाच अनुभवत होतो.

मला वाटले समाजसेवा करायची म्हणजे खूप काम करायचे. मात्र अपेक्षेपेक्षा काम खूपच कमी वाटले. कदाचित समाजसेवेचा हा पहिला कँप असल्याने कामापेक्षा मनोरंजनाकडे अधिक भर दिला गेला असावा. पण त्यामुळे जरा जास्तच मजा वाटली. समाजसेवेत एवढा आनंद असतो हे नव्यानेच कळले.

बघता बघता संध्याकाळ कधी झाली कळलेच नाही. सकाळपासून चालणे, दुपारचे श्रम यामुळे सर्वांनाच कंटाळवाणे झाले होते. यावर जणू औषध म्हणून संध्याकाळी मनोरंजनाचा कार्यक्रम ठेवला होता.

कविता करणे, प्रश्नमंच, दिलेल्या विषयावर बोलणे व थापा मारणे हे कार्यक्रम शेकोटीच्या आधी ठेवले होते. त्याचप्रमाणे अंताक्षरी देखील झाली. शेकोटीनंतर प्रत्येक गटाने २० मिनिटांत काही तरी कार्यक्रम करून दाखवायचा होता.

कार्यक्रमास दोन आफ्रिकन पाहुणेही आले होते. त्यांनी डोळ्यांनी शेकोटी पेटवून कार्यक्रमाची शोभा आणखीनच वाढवली होती. हे आफ्रिकन पाहुणे म्हणजे दुसरे तिसरे कोणी नसून आमचेच दोन मित्र मेकप करून

आले होते. कार्यक्रमाचा समारोप एका रहस्यमय कथेच्या कथनाने झाला. बराच वेळ झाल्यामुळे आम्ही अखेर झोपलो.

सकाळी नाष्टा केल्यावर चित्रकलेवर आधारित स्पर्धा घेतली. आमचे चार गट होते. प्रत्येक गटातील मुले ओळीत उभी राहिली. समोर एक मोठा कागद व काही रंग ठेवले होते. विषय होता 'शेकोटी'. प्रत्येक मुलाला एक मिनिट वेळ दिला होता. पहिल्या मुलाने येऊन चित्र सुरू करायचे व पुढच्या मुलांनी ते काढत काढत जायचे. यामध्ये आम्ही प्रयत्नांची शिकस्त केली. तरीही आमचा दुसरा क्रमांक आला. पण आम्ही आशा सोडली नाही. त्यानंतर आम्हा सर्वांना 'आदर्श गाव' हा प्रकल्प करायचा होता. त्यात मात्र आमच्या गटाने 'प्रथम क्रमांक' पटकावला. त्याचं खरं कारण म्हणजे दहावीतील ताई-दादांचे मार्गदर्शन; आणि आमची काम करायची जिद्द. शेवट प्रयत्नांचे फळ मिळाले. म्हणतात ना 'प्रयत्नांती परमेश्वर!"

आतापर्यंत नुसता आनंद, मजा झाली. परंतु आयुष्यात कधी ना कधी दुःखाशी सामना करावाच लागतो. एखादा माणूस जन्माला आला की त्याला मृत्यू अटळ. प्रत्येक गोष्टीला अंत आहेच. त्याचप्रमाणे आमच्या कँपचा समारोप झाला. निसर्गरम्य सुंदर विंचुर्णी सोडून जाण्याची वेळ आली होती. दोन्ही डोळे पाणावले होते; पण एका डोळ्यात घरी जाण्याची ओढ तर दुसऱ्या डोळ्यात विंचुर्णी न सोडण्याची इच्छा.

असा तो कँप एखाद्या शिलालेखाप्रमाणे माझ्या मनात कोरला गेला आहे. याशिवाय वेगळा तो अविस्मरणीय काल कोणता असणार?

कँप खरोखरीच छान झाला. विविध अनुभव आले. एकंदरीत समाजसेवा म्हणजे काय या प्रश्नाचे उत्तर पूर्ण उलगडण्यासाठी पुढच्या कँपची मी आतुरतेने वाट पहात आहे. तोही विंचुर्णीप्रमाणेच एखाद्या निसर्गरम्य गावात. असा हा अविस्मरणीय कँप मला खरोखरीच आवडला.

# शाळा सुटल्यावर

योगेश शिंदे इ. १० वी ('९८-' ९९)

शाळेतील शेवटच्या तासाला बोअर झालो होतो. सर्व जीव कानात एकवटून शाळेच्या बेलच्या आवाजाची आतुरतेने वाट पहात होतो. शाळेच्या घंटेवर पहिला टोल पडला. दिवसभर शाळेत एका जागेवर बसून आलेला कंटाळा झटकून टाकून मी टेबलवर विस्कटलेली वह्या पुस्तके कशीतरी दप्तरात कोंबत निघालो.

हो! पण आज माझा व शैलशचा झाडायचा वार होता. शैलेशने झाडले. मी केर भरला. वर्गाला कुलूप लावले आणि शैलशशी बोलत बोलत जिना उतरून सायकल आणण्यासाठी सायकल स्टँडकडे गेलो. गप्पा मारण्यात दंग होऊन गेलो होतो तेवढयात आईने शाळेतून लवकर घरी येण्यास बजावले होते ते आठवले. गप्पा मारत सायलकवरून मी तसाच घरी आलो. घरी गेल्यावर थोड्या वेळाने माझ्या लक्षात आले की कसलीतरी चावी माझ्या खिशात आहे. ही चावी माझ्याकडे कोठून आली हेच मी कितीतरी वेळ आठवत होतो. पण बुध्दीच्या पेटीत हरवलेला स्मृतीमणी काही केल्या सापडत नव्हता. त्या रात्री चावीविषयीच विचार करीत करीत झोपी गेलो.

सकाळी जरा उशिराच उठलो. पटकन सगळं आवरलं व शाळेत आलो. दप्तर ठेवायला वर्गाजवळ गेलो तर दररोज उघडा असणारा वर्ग आज बंद होता. बेल तर झाली होती. वर्गाबाहेर इतरांची दप्तरे होती. मीही तेथेच दप्तर ठेवले व प्रार्थनाहॉलमध्ये पसायदान म्हणण्यासाठी गेलो. पसायदान झाले. बातम्या वाचून झाल्या. मग सरांनी सर्वांपुढे १० वी च्या वर्गाच्या चावीविषयी बोलताच माझ्या डोक्यात सुरू असलेल्या विचारचक्राला गती मिळाली. आता माझ्या खिशातल्या चावीच्या रहस्याची चावी मला सापडली. सरांना विचारून मी घराकडे धाव घेतली. या चावीने मला खूप दमवले. सरांची बोलणी खाल्ल्यावर मी वर्ग उघडला व या रहस्यमय धावपळीनंतर वर्ग पुन्हा पहिल्यासारखा सुरू झाला.

कुलूप लावायच्या वारी म्हणजेच झाडण्याच्या वारी वर्गाला कुलूप लावून चावी किचनमध्ये ठेवायची असे घोकतच कुलूप लावायचे ठरवले.

# रंगलेला सामना

शैलेश भोसले, इ. १० वी ('९८-'९९)

"अरे, ऊठ! काय बडबडतोयस?" आईने मला हलवून जागे केले. रविवारी इयत्ता आठवी बरोबर क्रिकेटचा सामना पक्का झाला होता. त्या विचारातच मी झोपी गेलो होतो व झोपेतही माझ्या डोक्यात क्रिकेटच्या सामन्याचे चक्र फिरत होते.

मी अंथरूण झटकून उठलो व सर्व आवरून तयार झालो. मला चहाची सुध्दा शुध्द नव्हती. मी तसेच विमानतळ गाठले. थोड्या वेळाने इयत्ता आठवी व इयत्ता नववी असे दोन्ही वर्ग जमा झाले. स्टंप लावणे, खेळपट्टी निवडणे इ. कामे झाल्यानंतर दोन्ही संघाचे कर्णधार नाणेफेकीसाठी बाजूला गेले. प्रतिस्पर्धी संघाने नाणेफेक जिंकून आम्हाला गोलंदाजी करण्यास आमंत्रित केले.



सामना सुरू झाला. आम्ही क्षेत्ररक्षणासाठी एकदम तयार होतो. त्यांचे सलामीवीर फलंदाज योगेश काळे व जयराज गोसावी फलंदाजीसाठी मैदानात उतरले. आठवीतील इतर विद्यार्थी फलंदाजांना प्रोत्साहन देण्यासाठी जमा झाले होते व त्यातील एक आपल्या संघाची धावसंख्या वही व पेन घेऊन लिहिण्यासाठी बसला होता.सामना बारा षटकांचा होता.

आमच्या सलामी गोलंदाजाने गोलंदाजीला सुरवात केली. आठवीचे खेळाडू उत्साहाने ओरडू लागले. पण त्यांचा उत्साह जास्त वेळ टिकला नाही. पहिल्याच षटकात जयराज गोसावीचा महत्त्वपूर्ण बळी आमच्या संघाच्या पदरात पडला. त्याची जागा संदीप काकडेने घेतली. अशाच रीतीने थोड्या थोड्या धावसंख्येच्या अंतराने आम्हाला चार-पाच बळी मिळाले. त्यांच्या आशा मावळू लागल्या. तेथील घोळक्यात शांतता पसरली. शेवटी राहिलेल्या कच्च्या खेळाडूंना आऊट करणे हा आमच्या डाव्या हाताचा मळ होता. त्यामुळे आठवीच्या संघाची धावसंख्या सर्वबाद एक्कावन एवढीच होऊ शकली. आम्ही सर्व जण खुष होतो.

थोड्या विश्रांतीनंतर व पाणी प्यायल्यानंतर आम्ही फलंदाजीसाठी तयार झालो. हा सामना आता एकतर्फी झाला असं मला वाटलं. मला आमच्या संघाच्या फलंदाजीचा गर्व चढला होता. त्या गर्वाचे घर खाली करण्यासाठी दैवाने आमची स्थिती प्रतिस्पर्धी संघापेक्षा अधिक बिकट केली.

पहिल्याच चेंडूवर आमचा एक फलंदाज धावचित झाला. त्यानंतर रीघ लागल्याप्रमाणे सर्व फलंदाज पटापट आऊट होऊ लागले. आता माझ्यावर सर्व जबाबदारी होती. पण दोन-तीन चेंडू खेळून काढल्यानंतर योगेशच्या उसळत्या चेंडूवर मी झेलबाद झालो. आता सर्व संघाच्या आशा मंगेश व माणिकवर केंद्रित होत्या. आमची धावसंख्या कशीतरी चाळीसपर्यंत आली होती. अजून खूप बाकी होती. फक्त विकेटचीच काळजी. आठवीला सामना जिंकण्यासाठी फक्त एका विकेटची गरज होती.

आम्ही फलंदाजांना प्रोत्साहन देऊन त्यांच्या मनावरील ओझं कमी करण्याचा प्रयत्न करत होतो. त्या दोघांनी समजूतदारपणे खेळी करत एक-एक धाव जोडून धावसंख्या अठ्ठेचाळीसपर्यंत आणली. सर्वांच्या नजरा गोलंदाज व फलंदाज यांच्यावर खिळल्या होत्या. जस-जसं आमचं लक्ष्य जवळ येऊ लागलं तस-तसा चेंडूचा वेग वाढत होता. दोन्ही संघावर सारखेच ओझे होते.तरीही मंगेश व माणिक टिकाव धरून धावसंख्येत हळूहळू भर घालत होते.

विजयासाठी आम्हाला दोन धावांची गरज होती. योगेश चुरशीने चेंडू टाकत होता. पण त्याच्या प्रयत्नांना यश मिळत नव्हते. मग अखेरीस योगेशचा एक फुलटॉस चेंडू माणिकने खेळाडूंच्या डोक्यावरून टोलावला व पळून दोन धावा पूर्ण केल्या. आम्ही सर्वांनी एकच जल्लोष केला. मंगेश व माणिकला मिठ्या मारल्या.

अशा रंगलेल्या व प्रेक्षणीय सामन्याच्या विजयाच्या आनंदातच आम्ही घरी गेलो. ■

# सहल

माणिक शितोळे इ. १० वी ('९८-'९९)

आईची हाक ऐकू आली आणि मी पहिल्या हाकेत खडबडून जागा झालो. माझा आणि सकाळी लवकर उठण्याचा खरं तर छत्तीसचा आकडा आहे. त्या दिवशी अशक्य गोष्ट शक्य कशी झाली हा प्रश्न तुम्हाला पडलाच असेल. अहो तो तर दिवस होता माझ्या सहलीचा!

मी घाईतच भल्या पहाटे तयार झालो. आईने दिलेले डबे बॅगेत टाकले, बॅग खांद्यावर अडकवली व शाळेकडे निघालो. अजून सूर्योदय झाला नव्हता, पक्ष्यांचा किलबिलाट चालू होता. अशा त्या सकाळी मी रमत-गमत, निसर्गाचा आस्वाद घेत शाळेत गेलो.

मी शाळेत पोचल्यावर मला पहिला धक्का दिला तो बसने. ठरलेल्या वेळेवर बस आली होती हे पाहून मला खरचं छोटासा धक्का बसला. मागच्या दोन सहलींना मी वेळेवर आलो तेव्हा बस वेळेवर आली नव्हती. पण या वेळेस मी मुद्दाम जरा उशिरा गेलो तर बस वेळेवर आली. पण बसप्रमाणे मुले वेळेवर आली नसल्याने आम्ही ठरलेल्या वेळेपेक्षा अर्धा तास उशिराच निघालो.

सर्व मुले आल्यावर बस निघाली. मुलांनी एकच जल्लोष केला. आम्ही फलटण सोडले व रायगडकडे कूच केले.

आम्ही गप्पा मारत, गाणी गात तसेच निसर्गाचा आस्वाद घेत कधी रायगडानजिक पोहोचलो ते कळलेच नाही. रायगडच्या मध्यापर्यंत गाडी जात असल्याने आम्ही अर्धी वाट चढलो ती बसने.

असे म्हणतात की, "जंगल पहावे चालून तर गड पहावा चढून" यामुळे आम्ही रोपवेची सेवा नाकारून पुढील १४६० पायऱ्यांचा गड चढून जाण्याची जिद्द दाखवली व भर दुपारी गड चढू लागलो. मोठमोठाल्या उंच उंच पायऱ्या, वळणे वळणे घेत डोंगराच्या उंच शिखरावर जाणारी ती पायऱ्या पायऱ्यांची वाट पाहून निदान माझ्या मनात तरी पश्चात्तापाची पाल चुकचुकली. ६०-७० पायऱ्या चढतो न चढतो तोच आमच्या अंगातील त्राण गळून पडले, घशाला कोरड पडली. सरांना पाण्यासंबंधी विचारल्यावर वर गेल्याशिवाय मधे कोठेच पाणी नसल्याचे समजले. जीव आणखीनच अर्धमेला झाला.

उंच डोंगर व त्यातून वर जाणारी, झुडपात मध्येच गुडुप होणारी ती छोटी पायऱ्या पायऱ्यांची वाट. एका बाजूला खोल दरी तर दुसऱ्या बाजूला असलेली दाट मनमोहक हिरवीगार झाडी. काही वेळा दरीकडे तोल जाई. त्यामुळे आम्ही अगदी सावकाश गड चढत होतो. खरंच! पायात त्राण उरले नव्हते. पाय चालण्यास नकार दर्शवत होते. पण केवळ गड पाहण्याची उत्सुकता व गड चढण्याची जिद्द यामुळे



आम्ही सर्वांनी पाहता पाहता बराचसा गड चढला. आता आम्हाला दोन भलेमोठे काळे दगडी बुरुज व महादरवाजा दर्शनास पडला. जणू ते दोन काळे दगडी भक्कम बुरुज आमचे स्वागतच करीत होते. आम्हीही ते स्वागत स्वीकारून महादरवाज्यातून आत गेलो. मला वाटले गड आला पण कुठलीच वास्तू दृष्टीस पडली नाही. मग आम्हाला गड आणखी वर असल्याचे समजले. पुन्हा आमची पायपीट सुरू झाली. थोड्याच वेळात आम्ही झाडीतून जाणाऱ्या त्या पायऱ्यांच्या वाटेने थेट गडावर पोचलो व खुद्द रायगड माझ्या दृष्टीस पडला. प्रथम आम्ही जवळच असलेल्या विश्रामगृहातील पाणी



## बळी

एक होती शेळी
तिला देणार होते बळी ॥
वाजीत ढोल सनई चौघडे
मिरवणूक निघाली देवळाकडे ॥
गावात काही पाहुणी आली
प्रकार पाहून थक्क झाली ॥
मिरवणूक त्यांनी अडवली
माहिती आरोग्याची दिली ॥
उपसले गाळ भरले तळे
रोग यायचे बंद झाले
बळी देण्याचे काम थांबले ॥

धीरज चव्हाण, इ. ९ वी
('९९-'२०००)

## बाभळी होती एकली

हिरवी हिरवी पालवी फुटली
पिवळी पिवळी फुलेही फुलली।
काळी होती शरीर कटी
अंगान होती धडधाकट ती।
एक पाकोळी डुलली उडली
फुलातील मधु चाखून गेली।
एक चिमणी घरात आली
पिलाला घास भरवून गेली।
पुन्हा आपुली एकली उभी ती
दगड खडकात पाण्याच्या अभावी।
इतकी सहनशीलता मिळाली होती
एकली उभी ती बाभळी होती।

नादिया कुरेशी, इ. ९ वी ('९९-२०००)

(शाळा, पान १६ वरून)

मुंबईचे होमी भाभा सायन्स सेंटरचे एक वैज्ञानिक श्री गंभीर सर यांनी या विषयीची माहिती बरीच रंगवून सांगितली. अणुबाँबचे फायदे-तोटे, उपयोग, दुरूपयोगही सांगितले. ते विचार मुलांवर इतके प्रभाव पाडून गेले की शाळा सुटल्यावर प्रत्येकाच्या तोंडी अणुबाँब, अणुबाँब आणि फक्त अणुबाँबच! ■

(सहल)

मनसोक्तपणे प्यालो.

आम्ही बऱ्याच उंचीवर आलो असल्याने खालचे दृष्य खरचं रमणीय दिसत होते. छोटी छोटी चौकोनी शेते. खेळण्यातल्या घरांप्रमाणे छोटी छोटी कौलारू, पत्र्याची घरे, नागमोडी वळणे घेत मधेच झाडीत गुडूप होणारे रस्ते, रायगडाच्या संरक्षणार्थ चहूबाजूने उभे असलेले बलाढय डोंगर. ही दृश्ये खरचं किती रमणीय, मनोहर होती!

गड चढून वर येताच प्रथम डोळ्यांना भारावून टाकणारा सिंहासनावर विराजमान असलेल्या छत्रपती शिवरायांचा पुतळा. त्यावरील कोरीव काम शब्दांत मांडणे कठीणच!

नंतर आम्ही शिवाजीराजांचा मोडकळीस आलेला महाल पाहिला. तेथे सर्व किल्ल्याच्या परिसरात माणसाचे अस्तित्व दर्शविणाऱ्या प्लॅस्टिकच्या वस्तू व पिशव्या दिसत होत्या. त्यामुळे अर्थातच सर्व किल्ल्याची शोभा धुळीत मिळत होती. त्यामुळे मलाच काय माझ्या जागी कोणालाही मानवजातीचा तिटकारा आला असता. नंतर आम्ही तोफखान्याची जागा पाहिली. वेळेच्या अभावी आम्ही टकमक टोक, हिरकणी टोक पाहू शकलो नाही. कारण पुढे आम्हाला मुरुड जंजिऱ्याला जायचे होते. गडाखाली येऊन बसमध्ये बसलो आणि सायंकाळच्या मंद वाऱ्यात जंजिऱ्यास निघालो. ■

# ऊन

सबीना मणेर, इ. ८ वी ('९८-'९९)

फटफटायला लागले होते. माणसांची ये-जा सुरू झाली होती. शेतकऱ्यांना शेतात जायची घाई झाली होती. तर बायकांना काम उरकायची. मुलांचं रडणं चालू होतं. अशातच उजाडलं. शेतकरी गरम गरम भाकरीचा मेवा खाऊन तृप्त होऊन शेताकडे जाऊ लागले.

हळू हळू सूर्य वर येऊ लागला. काही मुलं पाटी दप्तर घऊन शाळेत जाऊ लागला. काहींच्या मनात अजिबात शाळेत जायचं नव्हतं. पण पाठीत रट्टे पडताच ती डोळे पुसत पुसत शाळेला पळत होती. काही नुसतीच फिरत होती. बायकांची नुस्ती घाई चालली होती. उकाडा मी म्हणत होता. तरी बाया घाम पुसत पुसत आपली कामं आवरत होत्या.

काही मुलं शाळेत जातो म्हणून बाहेर पडत होती आणि खेळत बसत होती. काही मुलं गोट्यांचा डाव मांडून खेळत होती. त्यातच त्यांची भांडणं होत होती. मारामाऱ्या होत होत्या. शिवीगाळ होत होती. आणि परत एकत्र खेळ सुरू होत होता. ती मुलं खेळात इतकी मग्न होती की त्यांना आपण खोटे बोलून येथे खेळत बसलो आहोत आणि आपली शाळा बुडली आहे याचे भानच राहिले नव्हते.

जसजसा सूर्य डोक्यावर येऊ लागला तसतसं जास्तच उकडू लागलं. शेवटी मध्यान्ह झाली. बायका फडक्यात भाकऱ्या बांधून घेऊन शेतावर जाऊ लागल्या. शेतकऱ्यांनी आपली कामे थांबवली आणि ते जेवायला बसू लागले. सर्वांनी योग्य जागा निवडल्या व ते बोलत बोलत जेवू लागले.

मुलं शाळेतनं परत आली. कसंतरी खाऊन खेळायला जाऊ लागली. मेंढरागत इकडे तिकडे फिरू लागली. काही मुलं झाडावरच्या मधमाशांच्या पोळ्याला दगडं मारत होती. एकदाका मधमाशांचा घोळका उठला की आपली चड्डी सावरत ओरडत ओरडत पळत होती. काहींना माशा चावत होत्या आणि त्या मुलांची तोंडं हत्तीसारखी सुजत होती.

बाहेर सूर्य तळपत असल्याने रस्त्यावर एक चिटपाखरूही दिसत नव्हते. सूर्य नुसता आगीच्या ज्वाळा ओतत होता. पूर्ण गावच भकास, शांत, अबोल भासत होता.

चावडीतील रिकामटेकडी माणसं निवांत गोष्टी करीत बसली होती. काही माणसं नुस्ती ऐकत होती आणि ऐकता ऐकता पेंगत होती. पेंगताना एकदम त्यांचा तोल जायचा आणि ती कोलमडायची. दचकून जागी होऊन परत नीट बसायची. एक-दोन मिनिटं गेली की परत पेंगायला लागायची. काही वेळाने झोपून जायची. एखाद्या भट्टीत पाव भाजावा तसं चावडीतल्या माणसांचं व घरातल्या बायकांचं अंग भाजून निघत होतं.

जेवणं संपली तरी शेतातील माणसं ऊन लागू नये म्हणून झाडाखाली बसली होती. काही गाढ झोपी गेली होती. काही आपली चंची सोडून पान-तंबाखू खात बोलत बसली होती.

उन्हाने लोकांना बेजार करून टाकले होते. ओढे, नाले यांच्यातले पाणी सुध्दा उकळलेल्या गरम पाण्यासारखे गरम झाले होते. काजवे चमकल्यासारखी मुलांची चपचपीत तेल लावलेली डोकी चमकत होती. डब्यातलं तूप वितळून त्याचे ओघळ यावे त्याप्रमाणे मुलांच्या डोक्यावरचे तेलाचे ओघळ गालावर वाहून येत होते. त्यामुळे त्यांचे चेहरे तेलकट घामेजलेले दिसत होते. शर्ट पाण्यात भिजल्याप्रमाणे घामाने भिजले होते. मुलांना वाटत होते ओढ्यात जाऊन मनसोक्त डुंबावे म्हणजे इतके उकडणार नाही. मुलं शर्ट काढून उघड्या अंगाने झेप घेत होती. पण ओढ्याचे पाणीही गरम झाल्याने मुलांना ते भाजत होते. बेडकाने पाणी दिसताच टुणकन उडी मारावी तशी मुलं उड्या मारत होती. आणि कपडे घालून परत खेळायला जात होती.

हळू-हळू सूर्य खाली येऊ लागला आणि मावळू लागला. लोकांना वाटत होते की कधी हा दिवस मावळतोय आणि कधी वारा सुटतोय. दिवस बराच खाली आला. तसे शेतकरी शेतातनं परत येऊ लागले. मेंढरागत मुलं ओरडत ओरडत आपल्या घरी येऊ लागली. गायी, बैल, शेळया, मेंढया ही जनावरंही आपल्या गोठयात येऊन निवांतपणे रवंथ करत बसली. दिवस मावळला. गावात पुन्हा किलबिलाट सुरू झाला. आणि दुपारचे भकास वाटणारे गाव आता गजबजून गेले. सर्वत्र अंधार पसरला आणि मंद शीतल असा वारा सुरू झाला. ■

# कावळा अजूनही गातो

राजेश निंबाळकर, इ. ९ वी ('९८-'९९)



फार फार वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एका भल्यामोठ्या समुद्रात एक छोटंसं बेट होतं. त्या बेटावर सुंदरबन नवाचं जंगल होतं. त्या जंगलात एक तळ होतं. त्या तळ्यातले पाणी सर्व प्राणी पीत. आपापले खाद्य गोळा करून ते खात असंत. त्या काळी सर्व प्राण्यांना सुंदर रंग होते. सर्वांप्रमाणेच कावळा आणि कोकिळा हेही रंगीत होते. त्या काळचा कावळा देखील कोकीळेसारखा गात होता. कोकिळेपेक्षाही चांगला!

पण त्या वेळच्या प्राण्यांची एक खूप मोठी समस्या होती. ती म्हणजे, त्या प्राण्यांचे रंग वर्षभर ऊन, वारा, पाऊस यामुळे जात होते. त्यांनी आपली ही समस्या ब्रम्हदेवांपुढे मांडली. ब्रम्हदेव चिंतित झाले. त्याने एक दूत नेमला की जो वर्षाच्या वर्षाला सर्व प्राण्यांना रंग देईल. यामुळे सर्व प्राणी खुष झाले. दरवर्षी वेगवेगळा रंग त्यांना मिळू लागला.

पण काही वर्षात रंग देणारा दूत कंटाळला. मधल्या काळात कावळ्याची आणि कोकिळेची भांडणं झाली. त्या दोघांना एकमेकांचा राग येऊ लागला. ते एकमेकांशी बोलत नसंत. एकमेकांजवळ बसत नसंत.

ब्रम्हदेवाचा दूत त्यांची समस्या घेऊन ब्रम्हदेवाकडे गेला. मग ब्रम्हदेवाने एक युक्ती शोधली. त्याने विष्णू आणि शंकराच्या मदतीने कधीही न जाणारे रंग बनविले. ते रंग प्राणी-पक्ष्यांना देण्यासाठी सर्व पक्षी एकत्र यावेत असे ब्रम्हाला वाटले. त्याने एका शुभ मुहूर्तावर पक्ष्यांची व प्राण्यांची सभा बोलवली.

त्या सभेला सर्व प्राणी-पक्षी वेळेवर हजर राहिले. पण कावळा आणि कोकिळा यांना उशीर झाला. सभेमध्ये बसण्यासाठी ज्या खुर्च्या होत्या त्या संपल्या होत्या. ब्रम्हाने त्या दोघांना शेजारीच असलेल्या रंगांच्या भांड्यांपैकी एकावर बसायला सांगितले. ते दोघेही एकाच भांड्याच्या दिशेने गेले आणि एकाच भांड्यावर बसले. "मी एकटाच यावर बसणार", असे दोघेही म्हणू लागले व एकमेकांना मारू लागले. त्या भांडणात दोघांचाही तोल जाऊन दोघेही त्या रंगात पडले. तो रंग होता काळा. तेव्हा पासून ते दोघेही काळे झाले. रंगात पडल्यावर कावळ्याच्या घशात थोडासा रंग गेला. त्यामुळे त्याचा आवाज कर्णकर्कश्य झाला. तरीही कावळा गाण्याचा प्रयत्न करतो आणि लोकांना त्रास देतो.

■

## कविता

### गोल चांदोबा गगनात

गोल चांदोबा गगनात ।
पडियेला उजेड अंगणात ॥
बाळ खेळतोही त्यात ।
त्याले उगविले दात ।
खातो दही आणि भात ।
माता फिरविते ह्यात ।
पळे मागोमाग जातं ।
मोती घाळीतेही त्यात ।
खाली पडतेही पीठ ।
गोळा करून ते नीट,
करु भाकरीही नीट ।
भरु आपले मग पोट
गोल चांदोबा गगनात ॥



चक्रधर खलाटे
इयत्ता ९ वी ('९८-'९९)

### दुर्दैवी तो कावळा

दुर्दैवी तो कावळा
ट्रक खाली सापडला
ट्रक निघून गेला
कावळा मात्र तेथेच राहिला ॥ १ ॥

माझ्या डोळ्यासमोरचा अपघात
टपकन पाणी आले डोळ्यात
मी पळतच गेले घरात
पाणी आणून सोडले त्याच्या तोंडात ॥ २ ॥

उचलून मी त्याला घरी आणले
थोड्यावेळाने खूप कावळे जमले
खूप वेळ काव-काव करत राहिले
अखेर आपल्या मार्गाला गेले ॥ ३ ॥

मनीषा ढेंबरे
इ. ८ वी ('९८-'९९)

### झाडे

झाडे आहेत मोलाची
त्यांची किंमत माणसाला नाही कळायची.
माणूस लागला झाडे तोडू,
पाऊस लागला कमी पडू.
झाडे सोडतात दिवसा ऑक्सिजन,त्यावर चालते
माणसाचे जीवन.
म्हणून म्हणतो झाडे नका तोडू
प्रत्येकाने एक झाड लावावे असा नियम काढू

धीरज चव्हाण
इ. ८ वी ( '९८-'९९)

# अविस्मरणीय प्रसंग

ताहीर मणेर, इ. ७ वी ('९७-'९८)

उन्हाळ्याचे दिवस होते. मे चा महिना होता. बाहेर रणरणते ऊन होते. शाळा नसल्याने घरी बसून खूप कंटाळा यायचा. कंटाळा घालवण्यासाठी आम्ही विंचुर्णीला जायचो. एकदा सुधीरकाका कोठेतरी गावाला गेला होता. आता सुधारीकाका नसल्याने आमचे विंचुर्णीला जाणे बंद पडले. आम्ही पाच-सहा दिवस विंचुर्णीला गेलो नाही. पण दोन दिवसांनंतर सुधीरकाका येणार, हे आम्हाला कळाल्यानंतर आम्ही पाच-सहा जणांनी विचार केला की सुधीरकाकाला खूष करण्यासाठी आपण त्यांचे घर साफ करु या. झालं आणि आम्ही विंचुर्णीची वाट धरली.

आम्ही दुपारी जात असल्याने माळावरती एकही चिटपाखरु दिसले नाही. सुधीरकाकांच्या घरी जाऊन आम्ही घर साफकरण्यास लागलो. एक दोन तास खपल्यानंतर एकदाचे घर साफ झाले. सगळ्यांच्या पाठी दुखू लागल्या. आम्ही बरोबर नेलेली बिस्किटे खाल्ली व जरा तलाव बघण्यासाठी सुधीरकाकांच्या घरापाठीमागे गेलो तर तलावाचे पाणी आटले होते व बेट वरती आले होते. बेटावर जावे असे सर्वांना वाटले. आम्ही राहिलेली बिस्किटे खिशात भरली व बेटावर निघालो.

आम्ही बेटावर जातानाअचानक दोन टिटव्या उडल्या व खूप गोंधळ घालू लागल्या. आम्ही खाली बघितले तर टिटवीची पिल्ले होती ती. पण वरती त्या दोन टिटव्यांचा असा कालवा चालला होता की लग्नाचा गोंधळ लाऊड स्पिकरवर लावला तरी कमीच वाटेल.

आम्ही बेटावर गेलो तर दोन बदके आमच्या पायापासून उडाली. आम्ही खाली पाहतो तर कढईसारखा उथळ खोल खड्डा व त्यात सात अंडी होती. घरटयाच्या कडेने बदकांची पिसे होती. म्हणजे बदकाचे घरटेही होतं तर तिथे. आम्ही परत येऊन सायकली घेऊन घरची वाट धरली. विमानतळावरून आम्ही जात होतो. खूप माणसे विमानतळावर फिरायला आली होती. काही माणसे गाडी शिकत होती. इतक्यात आमच्यापुढून एक इंडियन कोर्सर पळाला व त्याच्यामागे तीन लहान दगडे पळाली. आम्ही सायकली स्टँडला लावून पाहू लागलो तर आम्हाला कळले की ते तीन दगड नसून ती त्यांची पिल्ले होती. तो इंडियन कोर्सर कीटक पकडून आपल्या पिल्लांना भरवत होता. आम्ही जवळ-जवळ १५-२० मिनिटे हेच पहात होतो. अचानक सगळं शांत वाटलं. आम्ही वर पाहिलं तर धुळीचं वादळ येत होतं.

आम्ही तोंड फिरवली पण वादळ इतक्या जोरात होते की आमच्या सायकली पडल्या व आम्हाला वादळ पुढे ढकलू लागले. आम्हाला कोर्सरची चिंता वाटत होती. सायकली पडल्या, आम्ही पुढे ढकलली जातोय तर कोर्सर व त्याच्या पिलांचे काय झाले असेल? पायाला इतके खडे टोचत होते की असे वाटले आपले पाय मुंगळे असलेल्या पातेल्यात ठेवले आहेत.

पाच-दहा मिनिटांनी वादळ संपले तेव्हा आम्ही पाहिले तो कोर्सर आपल्या पिलांना भरवत होता. ते पाहून आम्हाला खूप बरे वाटले. मग वाटले जंगलात पक्ष्यांना घरट्याचा तरी थारा असतो पण माळावरच्या



पक्ष्यांना कशाचा थारा असतो? या असल्या वावटळीत ते स्वत:चा बचाव कसा करीत असतील हे एक कोडंच आहे. एखाद्या दगडाआड किंवा ओंजळभर खड्ड्यात जमिनीसरशी चिकटून बसून बहुतेक. म्हणूनच मी माळावरचे पक्षी म्हणजे श्रेष्ठ पक्षी असे मानतो.

■

# धामण

वसिम मणेर ( एफ वाय बी.एस. सी )

कच्च्या रस्त्यावरून फुफाटा उडवीत आलेली बस एका तिठ्याजवळ थांबली. रकसॅक सावरत धनंजय खाली उतरला. कंडक्टरने खाड्कन दार लावून घेतले आणि बेल मारली. थांबण्यापूर्वी उडालेला फुफाटा ओसरेपर्यंत त्यात नवीन फुफाट्याची भर घालीत बस खड-खड करीत निघाली. पुढच्या वळणावरच्या पाणी नसलेल्या ओढ्याला ओलांडून ती एका टेंगळावर चढली व पलिकडे उताराला लागली. बसचा आवाज कमी कमी होऊ लागला व उडालेली धूळही पुन्हा रस्त्यावर व आसपासच्या दगडांवर विसावू लागली.

धनंजय एव्हाना चालू लागला होता. मैलभर जायचे होते. महिना एप्रिलचा. उन्हाळा चांगलाच जाणवायला लागला होता. दुपारचे चार वाजले होते. उन्हं कलायच्या मार्गावर होती. तरी कडकपणा होताच. पण धनंजयला त्याचं काहीच वाटत नव्हतं. ह्याच मातीत तर तो वाढला होता.रकसॅक नीट घेऊन तो चहूकडे बघत निघाला. दूरपर्यंत पिवळ्या खुरट्या गवताचा माळ पसरला होता.



मधून मधून वाहणारे वारे खुरट्या गवतावर लाटा निर्माण करीत होते. माळाच्या मध्येच काही जमिनीचे तुकडे शेतकऱ्यांनी नांगरून ठेवल्याने माळ आणखीनच भकास दिसत होता. दोनचार काळ्या पोटाचे चंडोल हवेत उडून सूर मारताना शीळ घालत होते. ही शीळ मनाला हुरहूर लावते असे धनंजयला वाटे. तरीही त्याला ती फार आवडे. नांगरलेल्या रानातील एका ढेकळावर एक चंडोल क्षणभर विसावला.नंतर पुन्हा उडाला. ती शीळ घालण्यासाठी.

वाटेकडेच्या वाकड्या बोरीच्या चिवट खोडावर एक सरडा चिकटून होता. धनंजयला पाहताच तो खोडावर असा फिरला की बरोबर धनंजयच्या दृष्टीआड राहील. धनंजय जसजसा पुढे गेला तसतसा तो खोडावर फिरून आपली जागा बदलत राहिला. धनंजयला घाई होती. नाहीतर पंधरा-वीस मिनिटे त्याने येथे घालवली असती. वाटेने डावीकडे चंद्रकोरीप्रमाणे वळण घेतले. धनंजय गवताकडे बघत होता. फारच थोडे गवत शिल्लक होते. अतिचराईमुळे गवताच्या बऱ्याच जाती लोप पावल्या होत्या. माती तर नावालाच शिल्लक होती.

माती धुपून जाऊ नये व गवताळ माळ शिल्लक रहावा म्हणून त्याने आपल्या मळ्यात वडिलधाऱ्यांशी भांडून ठिकठिकाणी गवत राखले होते.

घरच्यांनी त्याला वेड्यात काढले. एक त्याचा आज्जा सोडून. मूळ वाट सोडून तो वाळलेल्या ओढ्यातून निघाला. माणसे व सायकली जाऊन जाऊन ओढ्याच्या वाळूत एक वाटच पडली होती. ओढा अरूंद होता. दोन्ही बाजूस बऱ्यापैकी गरदाड होतं. अचानक डावीकडे काहीतरी खसफस झाली. धनंजय थबकला. एक सात-आठ फूट लांबीची, पिवळसर, चपळ धामण वळवळत विद्युत गतीने या काठाकडून त्या काठाकडे गेली. अगदी क्षणार्धात. ती गेली त्या गचपणाकडे धनंजय बघत राहिला.

"वा! जबरदस्त!" अस निरर्थक उद्गार त्याने पुन्हा पुन्हा काढले. ते उमदं जनावर पाहून त्याला त्याचं दहावीचं वर्ष आठवलं तो रात्री जागून अभ्यास करायचा. इतरांना झोपायचं असे. म्हणून तो कोठीच्या खोलीबाहेर दिवा लावून बसे. एका रात्री फळीवरुन घमेली पडल्याचा आवाज आला. मग एकदा असाच काहीतरी पडल्याचा आवाज आला होता. तेव्हा तो घाबरुन लगेच डोक्यावर पांघरुण घेऊन झोपला होता. पण यावेळी मात्र त्याने काय आहे ते पहायचे ठरवले. एक दांडके हातात घेऊन त्याने सावधपणे दार उघडले. दरवाज्यामागचे बटन दाबले. खट्कन् बल्ब लागला. चिपटे, घमेली अस्ताव्यस्त पडली होती. एक दांडगा साप फळीवरुन पोत्यावर अर्धवट उतरला होता. त्याने हातातल्या दंडुक्याने सर्व शक्तिनिशी सापाच्या डोक्यामागे ठोका हाणला. मार लागलेल्या भागाच्या

मागचे शरीर उलटेपालटे होऊ लागले. दांडक्यानेच त्याने साप जमिनीवर ढकलला व धोपटून धोपटून थंड केला. शेपूट तेवढी थोडावेळ वळवळत होती. अखेर तीही निपचीत पडली.

आवळ आपट ऐकून घरातले सर्व जागे झाले. धनंजयचे वडील, काका, आई, चुलत्या सगळ्या आल्या. बारकी भावंड आली. वडिलांनी व काकांनी त्याची पाठ थोपटली. "वारं मर्दा" असे म्हणाले.

सर्वात शेवटी आज्जा आला. डोळे बारीक करुन त्याने सहाफुटी साप पाहिला. धनंजयला वाटले आपले नेहमी लाड करणारा आज्जाही आपली तारीफ करील. तो आज्ज्याकडे विजयी मुद्रेने, शाबासकीच्या आशेने पाहू लागला.

आज्ज्याने वर पाहिले व धनंजयच्या पाठीत रागाने रट्टा हाणला.

"त्वा धामन मारलीस..." असे म्हणून व्यथित होऊन तो निघून गेला.

धनंजयचा चेहरा गोरामोरा झाला. आज्जाचा दरारा असल्याने सगळे गुपचुप झोपायला गेले. धनंजयला मात्र त्या रात्री झोप लागली नाही.

पुढे आज्ज्याच्याच सांगण्यावरून धनंजयला शेतकीच्या कॉलेजमध्ये घातले. तेथे त्याने बी.एस.सी. केले. हे करतानाच तो आवर्जून वेगवेगळी निसर्ग निरीक्षण शिबिरे, ट्रेकिंग कँम्प्स, स्लाईड शोज, व्याख्याने यांना हजर राहू लागला. पुढे शिक्षण संपल्यावर तो घरीच शेती बघत होता. चांगला बागायतदार असला तरी उधळमाधळ नसे. त्याची पूर्वी निसर्ग पहाण्याची आवड होतीच पण आता त्यास एक दिशा होती. शेती हाच व्यवसाय असल्याने दोन्ही बघणे त्याला चांगले जमत होते. रानात काम करताना,देखरेख ठेवताना त्याची नजर चोहीकडे काहीतरी शोधत असे. निसर्गात घडणाऱ्या घटना टिपत असे.

आत्ताही तो दहा दिवसांचं निसर्ग निरीक्षण शिबीर संपवून आला होता. साऱ्या वाटेनं कायकाय पाहिलं, अनुभवलं याचा विचार तो करीत होता. पण जसंजसं घर जवळ येऊ लागलं तसतशा त्याला त्याच्या जबाबदाऱ्या आठवू लागल्या. घरी गेल्यावर काय काय करावं लागेल याचा विचार डोक्यात सुरु झाला. दादानी गव्हाचं काय काय ठरवलं असेल?' मोटारीचं लाईट बिल?

तो आता आपल्या मळ्यात घुसला. घर बरंच लांब होतं. तो इकडे तिकडे बघत चालला होता. मध्येच भुईमुगाच्या रानात घुसून तीन-चार काँग्रेसची रोपं मुळासकट उपटून बांधावर टाकली. धनंजयला येताना पाहून आप्पा धावतच आला. आप्पा धनंजयच्या मळ्यातला जुना गडी. तो तरूण असताना धनंजय त्याच्या अंगाखांद्यावर खेळला होता. प्रसंगी तो धनंजयलाही हुकूम देई आणि धनंजयही ते निमूट ऐकी.

आप्पानी धनंजयची रकसॅक घेतली आणि विचारलं "सगळं ठीक ठाक झालं नव्हं?"

"होय." धनंजय मोकळा झाल्यानं थोडे आळोखे पिळोखे देत बोलला.

"मायला किती वजन न्हैता धनी. कटाळा न्हाय येत हा वागवून?" आप्पा रकसॅक तोलत म्हणाला. "आप्पा सगळं सामन लागतंय. न लागणारं कोन न्हील का?" धनंजय म्हणाला.

"ती बी खरंच म्हना." आप्पा रकसॅककडे बघत म्हणाला. "बर ती जाऊ द्या." आप्पाने आपल्या नेहमीच्या लकबीने बोलायला सुरूवात केली. "आता तुम्ही काय करणार हायसा?" "काय नाय." धनंजय सहज म्हणाला. "मंग पयलं येक काम करा. मोटारसायकलवरतालुक्यात जा आन् उंदराचं औषद घिऊन या." "कशाला?" धनंजयनं चमकून विचारलं. "कशाला मंजी? नव्या गोडवानातला धा एकराचा घऊ उंदरास्नी खाया घालायचा व्हय? पिंजरा ठुला तरी व्येनं आत बी जायनांत. तुमी जा. आंदार पडूस्तवर येचाल बी. मोटार सायकलवर कितीक वेळ लागतो?" "च्या तरी पिऊंचा राव,'धनंजय बोलला. "आता काय तालुक्याला होटलं न्हाइती व्हय? तितंच प्या. आंदार करु नगा. निगा लवकर." असं म्हणून आप्पानं रकसॅक खाली ठेवली. तो गाडीची किल्ली सुध्दा घेऊन आला. किक मारून धनंजय निघाला. दगडी कच्चा रस्ता सोडून त्यानं बैलगाड्यांच्या चाकोऱ्यांची वाट धरली. अर्ध्या तासात तालुक्याला आला. चौकाचौकातून गाडी काढत तो औषधाच्या दुकानात आला. दुकानात शिरताच केमिकल्सच्या भपकाऱ्याने त्याला सूचना तो उभ्या उभ्या वाचू लागला. 'लहान मुलांपासून दूर ठेवा. घरातील पाळीव जनावरांपासून दूर ठेवा.' 'आयलासगळ्या इन्सेक्टिसाईड, पेस्टिसाईड्स्ची हीच बोंब.' मनाशी काहीतरी ठरवून त्यांन हातातलं पाकीट काउंटरवर ठेवलं. आणि 'हे नको' म्हणून तो बाहेर आला. किक मारुन त्याने गाडी आपल्या एका मित्राच्या घराकडे वळवली.


इकडे आप्पा वाटच बघत होता. खास साठवणीसाठी बांधलेल्या मोठ्याशा खोलीबाहेर, ज्याला तो गोडवान म्हणे, उभा राहून तो धनंजयची वाट बघत होता. अंधार पडू लागला. आप्पा बैचेन झाला. डासही चावू लागले.

वैतागून तो खोलीबाहेर फेऱ्या मारु लागला. तेवढ्यात गाडीचा आवाज आला आणि वळणावर दिवाही दिसलां.

"आला बवा." म्हणत त्याने निश्वास टाकला. मोटारसायकल जसजशी वळ येऊ लागली तसतशी धनंजयच्या हातातील पिशवी त्याला दिसू लागली.

धनंजयने औषध म्हणून चांगली पाच फुटी धामण आणली होती. गावातल्या आपल्या एका सर्पमित्राकडून. त्याने तिला अलगद फरशीवर सोडली. वळवळत ती एका लाकडी पाटाखाली शिरली.

"ही न्हाय ती पिडा कशालाव?" आप्पानं भीतभीत विचारलं.




धनंजयने लांबूनच गाडी बंद केली व उताराने गोडाऊनपर्यंत आला.

त्याने गाडी स्टँडवर लावली. त्याच्या चेहऱ्यावर एक स्मितहास्य होते.

"काय वो धनी ही कसली औसधाची पिशवी?" खाकी कापडी पिशवीडे आश्चर्याने बघत आप्पा बोलला. "उंदीर मारायचं नंबरी औषद हाय. बघाच आता." धनंजय हसत हसत म्हणाला.

आप्पानं खांदे उडवले व खालचा ओठ बाहेर काढला. . "दार बंद करा वाईच." धनंजय आप्पाला म्हणाला. आप्पानं प्रश्नार्थक मुद्रा केली. पण दाराला कडी घातली. धनंजयने एकवार सगळ्या खोलीत नजर टाकली. त्या प्रचंड खोलीत मोठ्या लाकडी पाटावर पोत्यांच्या थप्प्या होत्या. काही पोती उंदरांनी कुठेकुठे कुरतडली होती. बराच गहू सांडलेला होता. जमेल तेवढा आप्पानं एका पोत्यात भरुन पोत कडेला लावलं होतं. ते अर्धवट भरलेलं पोतंही उंदरांच्या तावडीतून सुटलं नव्हतं. "आता बेट्यांनो करा नासधूस" असं म्हणत धनंजयनं पिशवीचं तोंड उघडलं. औषध पाहून आप्पा चमकला. काय बोलावे त्याला कळेना. बोबडी वळायची वेळ आली.

"पिडा! धनंजय गालातल्या गालात हसला. जी औपद हाय. झक्कास औषध. बिन वास मारणारं आन बिनइशारी." धामण ज्या पाटाखाली गेली त्या पाटाकड बघत धनंजय म्हणाला. त्याचा चेहरा उजळला होता. त्यानं आप्पाशी बोलायला मान वळवली होती पण आप्पा केव्हाच दार उघडून वाड्यात पळाला होता. बाहेर पडता पडता त्याने दिवा बंद केला. बाहेर पडतापडता त्याला काहीतरी आठवले. तो पुन्हा आत गेला. खोलीची खिडकी उघडली व बाहेर येऊन कुलूप लावले. शांत चित्ताने तो वाड्यात शिरला. त्याच्या मनात विचार आला की आज आज्जा असायला हवा होता.

# कविता

## एक अश्रू निसटला

स्वप्नाच्या विश्वामध्ये आनंद मला भेटला
नित्य नव्या गोडव्याने प्रश्न त्याने विचारला.

म्हणतो कसा, सांग मुला तू सांग मला,
ह्या आनंदमय विश्वामध्ये जन्म का तू घेतला?

स्वतःच्या पद्यातील शब्दांसंगे हसवायला,
का कवितेतील यमकाच्या दुःखासंगे रडावयाला?
सांग मुला तू सांग मला, सांग मुला तू सांग मला.

आनंदाचा वाटसरू तू निराशेचे घोट का बरे
प्यायला?
जाणून घे हे मुसाफीरा की समोर आहे हास्याचा
प्याला.

अरे ही तर विश्वासाची चाहूल, विसर आता
दुःखाच्या नशेला.
ध्यानी असू दे एक मंत्र हा "थांबला तो संपला"
सूत्र सांगुनी एकमेव हे "आनंद" माझ्याच अंतरंगात
शिरला.

डोळे चोळीत मग उठलो मी नव्या जगाला पहायला.
उठल्यावरही अवघी, एकच टोचणी लागली मनाला.

आयुष्याच्या वाटेवरती एक अश्रू निसटला,
एक अश्रू निसटला!

अनिरुध्द राजदेरकर
इ. १० वी. ('९८-'९९)

## आयुष्य

आठवणींना कुरवाळीत, मी माझ्याच एकांताला प्रश्न
विचारतो,
"आयुष्य" हे काय आहे?
विश्वासाच्या बुशकोटातील नरड्याला गुंडाळलेला
विश्वासघाताचा टाय आहे.
आयुष्य हे काय आहे? ॥१॥

आठवणींना कुरवाळीत, मी माझ्याच एकांताला प्रश्न
विचारतो,
"आयुष्य" हा काय प्रकार आहे?
श्रध्दा, प्रेम, वात्सल्य का गैरसमजांचा बाजार
आहे?
"आयुष्य" हे काय आहे? ॥२॥

आठवणींना कुरवाळीत, मी माझ्याच एकांताला प्रश्न
विचारतो,
"आयुष्य" हे सरळ आहे?
का प्रेम, जिव्हाळा, विश्वासाचे मृगजळ आहे?
"आयुष्य" हे काय आहे? ॥३॥

आठवणींना कुरवाळीत, मी माझ्या एकांताला प्रश्न
विचारतो,
"आयुष्य" हे काय आहे? ॥४॥

आठवणींना कुरवाळीत, मी माझ्या एकांताला प्रश्न
विचारतो,
"आयुष्य" हे किती मोठे आहे?
कल्पनेच्या भरारीपेक्षा खूप खूप छोटे आहे.
"आयुष्य" हे काय आहे? ॥५॥

एवढे सगळेविचारल्यावर मलाच सांगतो माझा
एकांत,
आरशात पहा जरा म्हणजे घडेल तुला दृष्टांत ॥६॥

एकांताचे उत्तर ऐकून तोंड धरले मी पुढे आरशाच्या
आरशात पाहिल्यावर दिसल्या फक्त
आठ्या कपाळावरच्या ॥७॥

अनिरुध्द राजदेरकर
इ. १० वी. ('९८-'९९)

# रवी सर

प्रशांत वायसे, इ. ८ वी ('९८-'९९)

काही माणसांच्या जीवनात काही असे लोक येऊन जातात की ज्यामुळे त्यांचे जीवन बदलून जाते. आणि असेच एक आदर्श व्यक्तिमत्व जेव्हा हरवल तेव्हा मला, शाळेला, आम्हा सगळ्यांनाच धक्का बसला.

ज्याप्रमाणे रवीसर एक आदर्श शिक्षक म्हणून प्रसिध्द होते. त्याच प्रमाणे ते एक डॉक्टर म्हणूनहीप्रसिध्द होते. कुणाला लागलं, खरचटलं असलं तररवीसर कोठे आहेत असे तो मुलगा म्हणला नाही तर शपथच. शाळेचे बरेच व्यवहारही तेच बघत.ते हिंदी शिकवीत. त्यांची हिंदी



रविंद्र नारायण गायकवाड हे ते आदर्श व्यक्तिमत्व. असे व्यक्तिमत्व शोधून मिळणार नाही. अशी आदर्श व्यक्ती शाळेला, मला मिळाली हे एक भाग्यच नव्हे का? पण हे भाग्यही काही काळचेच... काळाला आमच्यातील स्नेहभाव, संबंध बघवला नाही म्हणा किंवा आणखी काही पण लवकरच रवी सर आमच्याकडून काळाने हिरावून नेले.

सीतेला रावणाने पळवून नेल्यानंतर रामाला, आपल्या सर्व शंभर पुत्रांना एकट्या भीमानेच मारले हे कळालेल्या धृतराष्ट्राला, अर्जुनाच्या हातून मारला गेलेला कर्ण हा आपलाच मोठा भाऊ आहे हे समजलेल्या युधिष्ठिराला, म. गांधींच्या हत्येनंतर धक्का बसलेल्या भारताला या सर्वांनाच जेवढा धक्का बसला असेल तेवढाच धक्का मला, शाळेला, सर्वांना रवीसर गेल्यावर बसला.

रवीसर मुलांच्यात व शिक्षकांच्यात होते. रवीसर एक आदर्श शिक्षक होते. प्रत्येक शालेय कामात त्यांचा सिंहाचा वाटा असायचा. सहल काढण्यात ते नेहमी पुढे असायचे. सर्व शिक्षक तसेच मुलांच्यातही ते अतिशय प्रिय होते.

शिकवण्याची पद्धत काही औरच. पण तरी आम्हा मुलांमध्ये ती इतकी रूजली होती की त्यांनी शिकवण्यास सुरूवात केली की तास संपूच नये असे वाटे.

मी जेव्हा ५ वीत होतो तेव्हा हिंदी राष्ट्रभाषा परीक्षेत मला १०० पैकी ९७ मार्कस् पडले. ७ वीत असताना २०० पैकी १८६ मार्कस् पाडून मधुराने राज्यात पहिला क्रमांक मिळवला. या दोन्ही गोष्टींच्या वेळेस त्यांना झालेला आनंद मला अजून आठवतो आहे.

रवीसरांचा स्वभाव विनोदी होता. पण प्रसंगी कडक बनण्यासाठी ते मागे नव्हते. त्यांनी अनेक छंद जोपासले होते. त्यातील एक म्हणजे निसर्ग छंद. विश्व प्रकृती निधीचा सभासद होण्याची त्यांची इच्छा होती. पण ती इच्छा इच्छाच राहिली.

चौकसपणा हा गुण त्यांनी जोपासला होता. आणि या चौकसपणामुळे की काय रवीसर आम्हा मुलांमध्ये प्रिय होते. त्यांचं अक्षर मोत्यासारखं होतं. त्यांचामुलगा निखिल हा आमच्या शाळेत बालवाडीत शिकत होता. रवीसरांच्या पत्नी सुनिता गायकवाड

# कविता

## उणीव

मन जेंव्हा दुःखी होतं
अनेक आठवणींच्या जाणिवेनं
अंगावरती शहारे येतात
दुःखाच्या त्या स्पर्शानं
जुन्या स्मृती मग आठवू लागतात
मनही तेंव्हा रमू लागतं
आठवणींची पानं उमलू पहातं
एक एक अनुभव न्याहाळू लागतं
आसवही डोळ्यात जमू लागतात
जेंव्हा तुमची आठवण येते.

अनिता लाटे
इ. १० वी ('९७-'९८)

## खेळ सुख दुःखाचा

सुख दुःखाच्या आकाशातही
पक्षी भरारी घेतो
कधी अंधारातून उजेडात उडून जातो.
कधी अडकुनी वादळात अंधारातची राहतो
कधी माळरानावरून झरा खळाळत जातो.
पुढे जाऊन गवताला हिरवा रंग देतो.
असाच सुख दुःखाचा खेळ सतत होतो.
आनंदाच्या चांदण्यातून दुःखाचा काटा येतो.

समीरा कुरेशी
इ. १० वी ('९७-'९८)

---

याही शाळेत ग्रंथालयात होत्या. अशा प्रकारे त्यांचं कुटुंबच शाळेशी बांधलं होतं.आणि तो काळदिवस उगवला.

१२ ऑक्टोबर १९९८ ची सकाळ. ते दिवस सहामाही पेपरचे होते. सकाळी मी शाळेत गेलो. वर्गात येतो न येतो तोच कौस्तुभ सांगत आला की रवीसरांचा ॲक्सिडेंट झाला. वर्गातील मुले स्तब्धच झाली. थोड्याच वेळात ही बातमी शाळेत झाली आणि साऱ्या शाळेवर शोककळा पसरली.

नुसता ॲक्सिडेंट होऊन गाडी पायावरून गेली एवढेच कळले. पण जेव्हा रवीसर गेल्याची बातमी कळली तेव्हा मात्र धक्का बसला. बातमी खोटी वाटून शाळेत परत चौकशी केली. आणि बातमी खरी होती हे कळले तेव्हा मात्र मला रडू कोसळले. मीच काय तर सर्व शाळाच शोकाकुल झाली होती. शाळेची इमारतही जणू शोक सागरात बुडाली होती. मला शामची आई मधील अंगाईगीताच्या ओळी आठवल्या.

रवी गेला रे सोडुन आकाशाला
सौभाग्य जसे सदनाला.

रवीसर, आम्हा सर्वांना पोरकं करून जाण्याचा तुम्हाला काय अधिकार होता?

■

---

*'नवनीत'चा हा अंक डॉ. मॅक्सिन बर्नसन यांनी फक्त खाजगी वितरणासाठी प्रकाशीत केलेला आहे.*
*प्रकाशकांचा पत्ताः कमला निंबकर बालभवन रिंग रोड,अधिकार गृहा जवळ फलटण ४१५५२३*
*फोनः ०२१६६-२३३२४*



हे नवीन वर्ष व नवीन सहस्रक

सर्वांना सुखसमाधानाचे जावो!



अरे, मेणबत्ती कशी विझली?

बालवाडी मोठा गट.



पाव किलोत किती बटाटे बसतात?

वजन - मापे - तिसरी




एका कागदातून काय काय बनते?

कार्यानुभव - पहिली.



अय्या! किती मज्जा!

प्राजक्ता कुलकर्णी



एकमेका सहाय्य करू.

सौरभ व आम्रपाली



सा रे ग म

पल्लवी व अर्चना